कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १७ जुलै २०२५

किंमत ४ ₹

## प्रधानमंत्री धन धान्य योजनेला मंजुरी

**नवी दिल्ली :** देशातील शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधी योजनेचा हफ्ता कधी मिळणार याची उत्सुकता असतानाचा आता केंद्रीय कॅबिनेटमध्ये पीएम धन धान्य कृषी योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. २४ हजार रुपये दरवर्षी खर्च होणाऱ्या, विविध ३६ योजनांना एकत्र आणलेल्या पीएम धन-धान्य कृषी योजनेला केंद्र सरकारच्या कॅबिनेट बैठकीत मंजुरी मिळाल्याची माहिती, केंद्रीय प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. या योजनेमुळे देशातील १.७ कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी या योजनेची घोषणा केली होती.

## मुंबई ते रत्नागिरी अवघ्या तीन तासांत

**मुंबई :** यंदा २७ ऑगस्ट २०२५ रोजी गणपती बाप्पाचे आगमन होणार आहे. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना लवकर सागरी प्रवासाचा पर्याय खुला होणार आहे, अशी माहिती मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी बुधवारी (दि.१६) दिली. मुंबई ते रत्नागिरी तसेच मुंबई ते सिंधुदुर्ग २ फेरी लवकरच सुरू होणार आहेत. यामध्ये एकावेळी ५०० प्रवाशांसह १५० गाड्या वाहून नेण्याची क्षमता असणार आहे. तसेच मुंबई ते विजयदुर्ग प्रवास अवघ्या ४.५ तासात तर मुंबई ते रत्नागिरी अवघ्या तीन तासात करता येणार असल्याचेही ते म्हणाले.




## वेधक

### भरदिवसा घरफोडीत १८ तोळे सोन्याची चोरी

**उरण :** तालुक्यात भरदिवसा होणाऱ्या चोऱ्यांनी नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचा सूर वाढत चालला आहे. मंगळवार, दि. १५ जुलै रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास द्रोणागिरी नोड, सेक्टर-५० येथील स्काय सिटीतील 'अनंत कॉर्नर' इमारतीच्या ८०१ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये राहणारे दीपराज चंद्रकांत ठाकूर यांच्या घरी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत सुमारे १८ तोळे सोन्याचे दागिने, अंदाजे १४ लाख ४० हजारांची मालमत्ता लंपास केली. या घटनेत विशेष म्हणजे घराचे लॅच लॉक तोडून बेडरूममधील कपाट उघडून चोरट्यांनी अत्यंत शिताफीने दागिने चोरी केले. चोरी पान २ वर

### वडिलांचा मुलाच्या गळ्यावर ब्लेडने वार

**पनवेल :** दारूच्या नशेत आई-वडिलांशी सतत भांडण करणाऱ्या मुलाच्या गळ्यावर त्याच्या वडिलांनी रागाच्या भरात ब्लेडने हल्ला केल्याची धक्कादायक घटना कामोठेत घडली आहे. या हल्ल्यात मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याला कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर कामोठे पोलिसांनी मुलावर हल्ला करणाऱ्या पित्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. अमोल जाधव (३३) असे मुलाचे नाव असून, त्याच्यावर ब्लेडने वार करणाऱ्या त्याच्या पित्याचे नाव रवींद्र जाधव (६८) असे आहे. पान २ वर

### दानवेंचा कार्यकाळ संपला

**मुंबई :** ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या आमदारकीचा कार्यकाळ बुधवारी संपुष्टात आला. त्यामुळे त्यांचा निरोप समारंभ पार पडला. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती नीलम गोऱ्हे आदी उपस्थित होते. दानवे ऑगस्ट २०१९ मध्ये आमदार म्हणून निवडून आले होते. छत्रपती संभाजीनगर जालना स्थानिक स्वराज्य संस्थांमधून ते विधान परिषदेच्या जागेवर निवडून आले होते.

# शेतकऱ्यांची थट्टा



## जिल्ह्यातील 1,172 पात्र शेतकरी प्रतीक्षेत

## वर्षभरानंतरही पीकविम्याची रक्कम मिळेना

प्रमोद जाधव

| अलिबाग |

**बदलत्या हवामानामुळे शेतकरी पिकांना संरक्षण मिळावे, शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या उभारी देण्यासाठी पंतप्रधान विमा योजना राबविण्यात आली आहे. मात्र, २०२४ मध्ये विम्यासाठी पात्र ठरलेले एक हजार १७२ शेतकरी अजूनही विम्याच्या प्रतीक्षेत असल्याची माहिती समोर आली आहे. या शेतकऱ्यांना ८८ लाख रुपयांची विमा रक्कम देणे शिल्लक राहले आहे. या योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने न झाल्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा मदतीसाठी शासनाकडे आशेने पाहात असताना, त्याला आर्थिक मदतीपासून वंचित ठेवून थट्टाच मांडली असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

रायगड जिल्हामध्ये ९३ हजार हेक्टरहून अधिक भाताचे क्षेत्र आहे. ९८ टक्क्यांहून अधिक शेतकरी पावसाच्या पाण्यावर भातलागवड करतात. तर, उर्वरित शेतकरी पावसाच्या पाण्याबरोबरच दुबार पिकाची लागवड करतात. त्यामुळे भातलागवडीला मोठ्या प्रमाणात महत्त्व जिल्हयामध्ये आहे. दरवर्षी अतिवृष्टीसह पावसाच्या हंगामात पाऊस न पडल्याने पिकांना फटका बसतो. त्याचा परिणाम भात उत्पादनावर होतो. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडतात. खर्च अधिक आणि उत्पन्न कमी अशी परिस्थिती निर्माण होते. शेतकऱ्यांना उभारी देण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पंतप्रधान विमा योजना जिल्ह्यात सुरु करण्यात आली.

पेरणी न होणे, पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक पान २ वर

### आधार लिंकचा सावळागोंधळ

शेतकऱ्यांकडून विमा उतरविताना त्यांच्या बँकेची सर्व माहिती घेतली जाते. बँक खाते क्रमांकापासून आधार कार्ड क्रमांसहित अनेक कागदपत्रे घेतली जातात. परंतु, बँकेचे खाते आधार लिंक नसल्याचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. सेतू कार्यालयांसह वेगवेगळ्या सेवा केंद्रांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना आधार लिंक करावे लागत आहे. त्यासाठी वेळेबरोबरच पैसादेखील खर्च होत असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. आधार लिंक वेळेवर न झाल्याने शेतकरी विम्याच्या रकमेपासून वंचित राहिले आहेत.

> जिल्ह्यातील ४० हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी विम्याची नोंदणी केली. एक हजार ८००हून अधिक शेतकऱ्यांचा विमा मंजूर झाला आहे. त्याचा निधीही प्राप्त झाला आहे. विम्याची रक्कम देण्याचे काम सुरू झाले आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे विम्याची रक्कम शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. लवकरात लवकर सर्वच शेतकऱ्यांना विम्याची रक्कम दिली जाईल. जिल्ह्यात यावर्षीदेखील विमा नोंदणी सुरू केली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी विमा नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.
>
> – वंदना शिंदे, अधीक्षक जिल्हा कृषी अधिकारी, रायगड

## सीसीटीव्हीच्या दुरुस्तीचा सीओंना विसर

### अधिवेशनात डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी उठविला आवाज



### बंद कॅमेरे तातडीने दुरुस्त करण्याची मागणी

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग शहरातील पर्यटकांसह स्थानिकांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. लाखो रुपये खर्च करून ११६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले. परंतु, त्यांची वेळेत दुरुस्ती न केल्याने २१ कॅमेरे बंद स्थितीत आहेत. याबाबत शेकापचे आ. बाबासाहेब देशमुख यांनी अधिवेशनात आवाज उठवून अलिबाग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या कामांबाबत नाराजी व्यक्त केली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्यास मुख्याधिकारी यांना विसर पडला असून, देखभाल व दुरुस्ती नगरपरिषदेने कंत्राटदारांनी देऊनही दुरुस्ती का वेळेवर झाली नाही, असा सवाल उपस्थितीत करीत बंद झालेले सीसीटीव्ही कॅमेरे लवकरात लवकरच चालू करण्यात यावेत, अशी मागणी अधिवेशनात केली.

अलिबाग हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर आहे. वर्षाला दोन लाखांपेक्षा अधिक पर्यटक अलिबागमध्ये फिरण्यासासाठी येतात. अलिबाग तालुक्यात वेगवेगळे प्रकल्प येऊ घातले आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या भागांतील नागरिक कामगार म्हणून अलिबागमध्ये येत आहेत. अलिबागमध्ये पर्यटकांसह स्थानिक व अन्य नागरिकांची वर्दळ वाढली आहे. शहराचा विस्तार दिवसेंदिवस होत असताना नागरी व मालमत्ता सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गुन्हेगारी, गैरप्रकार, अवैध पार्किंग तसेच संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी अलिबाग शहरात ठिकठिकाणी ११६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. त्या कॅमेऱ्यांची देखभाल दुरुस्ती वेळेवर न केल्याने शहरातील २१ सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडले आहे. अलिबाग शहराचा कारभार सध्या प्रशासनामार्फत चालत आहे. प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव कार्यरत आहेत. एका ठेकेदाराला कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्याचा ठेका त्यांच्या माध्यमातून देण्यात आला आहे. या कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्यासाठी वेळोवेळी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात आला आहे. परंतु, अजूनपर्यंत या कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली नसल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत शेकापचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आवाज उठवून सीसीटीव्ही कॅमेरांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, पोलीस अधीक्षक यांनी कळवूनदेखील कॅमेरे दुरुस्तीसाठी मुख्याधिकारी यांच्याकडून कार्यवाही पान २ वर

### पाथरज आश्रमशाळेतील धक्कादायक घटना

## मुख्याध्यापकाची विद्यार्थ्यांना मारहाण

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्याच्या दुर्गम भागात असलेल्या पाथरज आदिवासी आश्रमशाळेतील मुलांकडून अग्निशमन सिलिंडर फुटला. या कारणावरून प्रभारी मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना छडीने मारले. या मारहाणीत मुलाच्या हातावर वळ उठले आहेत. ही घटना समजताच आदिवासी संघटनेचे कार्यकर्ते आश्रमशाळेत येऊन घडल्या प्रकाराची माहिती घेतली.

पाथरज आदिवासी आश्रमशाळेतील बारावीच्या काही विद्यार्थ्यांनी अग्निशमन सिलिंडर बाथरूममध्ये नेऊन फोडले. हे आश्रमशाळेचे प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे यांना समजले. त्यांनी हा प्रकार कुणी केला? हे विचारण्यासाठी बारावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना विचारले. परंतु, एकही विद्यार्थी नाव सांगत नव्हता म्हणून त्या रागात बनसोडे यांनी चार विद्यार्थ्यांना छडीने मारले. त्यांच्या मारण्याने मुलांच्या हातावर छडीचे वळ उठले. मात्र, पान २ वर




> विद्यार्थ्यांना मारणे ही चूकच आहे. ही चूक प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे यांनी मान्य केली आहे. यापुढे असे कृत्य होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.
>
> – अनंत खैरे, गटशिक्षण अधिकारी, कर्जत

### सिलिंडर फोडला

गेल्यावर्षीसुद्धा जुलै महिन्यातच त्यावेळच्या बारावीच्या विद्यार्थ्यांनी अग्निशमन सिलिंडर आपटून फोडला होता आणि यावर्षीसुद्धा तोच प्रकार यावेळच्या बारावीच्या विद्यार्थ्यांनी केला. या स्फोटामुळे मुलांचे शारीरिक नुकसान होऊ शकते.

## आव्हाड-पडळकर आमनेसामने

| मुंबई | प्रतिनिधी |

विधानभवनाच्या गेटवरच भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यामध्ये जोरदार राडा झाला आहे. यावेळी दोन्ही नेत्यांकडून एकमेकांना शिवीगाळ करण्यात आली आहे. गोपीचंद पडळकरांच्या गाडीचा दरवाजा लागल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला. त्यानंतर दोघांमध्ये जोरदार राडा झाल्याचं पाहायला मिळालं. दोन्ही नेते यावेळी चांगलेच आक्रमक झाले. त्यानंतर आव्हाड यांनी पडळकरांवर जोरदार हल्लाबोल केला. आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडून सातत्यानं राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्यांवर जोरदार हल्लाबोल सुरू असतो.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग निसरडा

### सहा वाहने घसरून मोठा अपघात

| रायगड | प्रतिनिधी |

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा रस्ता पावसामुळे निसरडा झाला असून, मंगळवारी सहा वाहने घसरून एकमेकांना धडकल्याने विचित्र अपघात अपघात झाला. या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरुन छोटा हत्ती टेम्पो (एमएच १२ बीएफ ७२२८) चालक सौरभ नितीन शिंदे हा मुंबईहून पुण्याकडे घेऊन जात असताना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत भातान बोगद्यात आला असता त्याचा टेम्पो घसरल्याने तो पलटी झाला. तर, त्याच्या बाजूने भरधाव वेगात येणाऱ्या आयसर टेम्पोने (एमएच ४६ बीएम ३२७३) त्याच्या पुढील अज्ञात वाहनास जोरदार धडक दिली, तर त्याच्या पाठीमागून येणारी ट्रॅव्हल्स बस क्रमांक (एमएच ०१ ईडब्ल्यू ३२०१) ही चालक सुनील चक्रवती याने ब्रेक मारल्याने बस पावसाच्या पाण्यामुळे घसरून बोगद्याच्या तिसऱ्या लेनच्या भिंतीला जोरदार धडक देऊन आडवी झाली, तर त्याच्या पाठीमागून येणारी टेम्पो ट्रॅव्हल्स बस (डीडी ०१ एक्स ९७३०) हीसुद्धा घसरल्याने तिने समोरील अज्ञात कंटेनरला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात परशुराम दत्तात्रय हेगडे (४९, रा. कोल्हापूर), लियाकत नालबंद (७५), दिपक गिरीधर गावकर (४२), अनिल ढाकणे क्रेन मदतनीस हे चार जण गंभीर जखमी झाल्याने त्यांना तात्काळ एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातात एकूण सहा वाहने बाधित झाले पान २ वर



## तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघरमधील ओवे कॅम्प तलावात बुडून अमन यादव (१८) या महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मृत तरुण विद्याविहार येथील एस.के. सोमय्या महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याचे निदर्शनास आले. मुंबई-चुनाभट्टी परिसरातील सात ते आठ तरुण खारघरमधील धबधब्यावर आनंद घेण्यासाठी आले होते. पांडवकडा धबधब्यात प्रवेश मनाईमुळे हे तरुण ओवे कॅम्प येथील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या तलावात आंघोळ करताना एक तरुण बुडाल्याची माहिती खारघर अग्निशमन जवानांना मिळाली. अग्निशमन पथकाकडून तलावात गळ टाकून मुलाचा शोध घेतला.

## अंबा नदीत आदिवासी महिलेची उडी

### कोलाडच्या रेस्क्यू टीमची शोधमोहीम सुरू

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्याजवळील चिकणी येथील आदिवासी वाडीतील ३५ वर्षीय महिला अलका लहू जाधव हिने अंबा नदीत उडी घेतली आहे. बुधवारी (दि.१६) सकाळी ८.३० वाजता ही घटना घडली आहे. या महिलेची शोधमोहीम कोलाड येथील सह्याद्री वनजीव संरक्षण संस्थेच्या रेस्क्यू टीमकडून सुरू आहे.

यासंदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, नागोठणे बाजूकडून वरवरठणे बाजूकडे ही आदिवासी महिला व तिचा पती हे दारूच्या नशेतच नागोठण्यातील जुन्या ऐतिहासिक पुलावरून चालत जात असताना या महिलेने आपल्या हातातील पिशवी खाली ठेवून अंबा नदीत उडी घेतल्याची प्राथमिक माहिती उपलब्ध झाली आहे. अंबा नदीला मंगळवारी पूर येऊन गेला असला तरी अंबा नदी बुधवारीही तुडुंब भरून वाहात असल्याने ही आदिवासी महिला पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेली आहे.

या घटनेची माहिती मिळताच नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी त्वरित घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर त्यांनी लगेचच माजी आ. अनिकेत तटकरे यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या सह्याद्री वनजीव संरक्षण संस्थेच्या रेस्क्यू टीमला पाचारण केले. या रेस्क्यू टीमचे प्रमुख सागर दहिंबेकर यांच्यासह स्वतः सपोनि सचिन कुलकर्णी तसेच रेस्क्यू टीमचे सदस्य प्रयाग बामुगडे, पान २ वर



● (छायाचित्र : महेश पवार)

## सरकारविरोधात विरोधक आक्रमक

### विधिमंडळाच्या पायऱ्यांवर बनियन-टॉवेल लावून घोषणाबाजी

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्रविधिमंडळाचेपावसाळी अधिवेशन सुरू आहे. बुधवारी विरोधकांनी सत्ताधाऱ्यांविरोधात आक्रमक पवित्रा घेत अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. महाविकास आघाडीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (ठाकरे) आणि काँग्रेसच्या आमदारांनी एकत्र येत अंगात बनियन घातले आणि कमरेला टॉवेल गुंडाळत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली.

शिवसेनेचे (शिंदे) आमदार संजय गायकवाड यांनी काही दिवसांपूर्वी आमदार निवासातील कँटिनमध्ये बनियन आणि टॉवेलवरच एका कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. तसेच याचे पडसाद विधिमंडळातही उमटले. संजय गायकवाड यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली. तसेच काही दिवसांपूर्वी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचाही एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. ज्यामध्ये ते आपल्या बेडरुममध्ये बनियनवर बसलेले दिसत होते. तसेच मंत्री भरत गोगवले यांच्याही घरातील टॉवेलवरील व्हिडीओ व्हायरल झाला होता.

या तीनही घटनांचा संदर्भ घेत विरोधकांनी शिवसेना (शिंदे) गटाला घेरण्याचा प्रयत्न केला. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभेतील आमदार जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, सतेज पाटील, महेश सावंत यांनी या आंदोलनात सहभाग घेत जोरदार नाजेबाजी केली.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, महाराष्ट्रात चड्डी बनियन गँगने हैदोस घातला आहे. कँटिनमध्ये जाऊन आमदार साध्या कर्मचाऱ्याला मारहाण करतात. कुणी सिगारेट पिताना सुटकेसभर पैसे जगाला दाखवतात. कुणी चड्डी-बनियनवर घरात बसून ओम फट म्हणतात. चड्डी बनियन गँगची दहशत पूर्वी महाराष्ट्रात होती. ही गँग शेतात, वस्त्यांवर दरोडे टाकायची. आताची चड्डी बनियन गँग महाराष्ट्रावर दरोडा टाकण्याचे काम करत आहे.

### दररोज दोनशे किलोमीटरचा प्रवास | आपत्कालीन सेवेमुळे रुग्णांसाठी जीवनवाहिनी

## जिल्ह्यात '१०८' सुसाट

### अकरा वर्षांत दीड लाख रुग्णांनी घेतला लाभ




| अलिबाग | प्रतिनिधी |

आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना जलद वैद्यकीय मदत देण्यासाठी १०८ रुग्णवाहिका प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. आपत्तीच्या काळात फोन केल्यानंतर काही मिनिटांत मदतीसाठी पोहोचणारी ही रुग्णवाहिका दररोज २०० किलोमीटरचा प्रवास करत असते. २०१४ पासून या रुग्णवाहिकेचा सुरु झालेला प्रवास सुसाट सुरु आहे. दरम्यान, अकरा वर्षांमध्ये या रुग्णवाहिकेचा जिल्ह्यातील एक लाख ५० हजार १२६ रुग्णांनी लाभ घेतला आहे. रुग्णांना आपत्कालीन सेवा मिळत असल्याने आधार मिळाला आहे. त्यामुळे ही रुग्णवाहिका रुग्णांसाठी जीवनवाहिनी ठरत असल्याचे चित्र आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा रुग्णालयांसह उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, तसेच ५५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २८८ उपकेंद्र कार्यरत आहेत. शहरी भागासह ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सर्वसामान्यांना चांगली मिळावी, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचा प्रयत्न राहिला आहे. मात्र, रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याच्या तक्रारी कायमच आहेत. त्यामुळे अनेकवेळा रुग्णांना मुंबई, पुण्यासारख्या पान २ वर

### नव्या रुग्णवाहिकांची प्रतीक्षा कायम

इंजिन बंद पडणे, स्टेअरिंगची समस्या निर्माण होणे, असे अनेक प्रश्न रुग्णवाहिकेबाबत सुरु झाले आहेत. जिल्ह्यात कार्यरत असलेल्या रुग्णवाहिका जुन्या झाल्या असून, आतापर्यंत या रुग्णवाहिकांनी साडेतीन लाख किलोमीटरचा प्रवास केला आहे. लवकरच या रुग्णवाहिका भंगारात जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे नव्या रुग्णवाहिकेची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

### रुग्णवाहिकेच्या सेवेवर दृष्टीक्षेप

| | |
|---|---|
| वाहन अपघात | 8345 |
| हल्ल्यात जखमी झालेले | 1017 |
| भाजलेले | 885 |
| वैद्यकीय मदतीसाठी असणारे | 1,30,433 |
| आत्महत्या करणारे रुग्ण | 140 |
| पडलेले | 3508 |
| गंभीर दुखापत | 5798 |
| एकूण | 1, 50, 126 |

# दर्याच्या राजाची बंदरांवर लगबग

## बंदीनंतर मासेमारीसाठी २० दिवस आधीच तयारी; ससूनडॉक, करंजा, मोरा, कसारा बंदरात गर्दी



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**१ जूनपासून मासेमारी बंदीनंतर खोल समुद्रातील पावसाळी १ ऑगस्टपासून मासेमारीला सुरुवात होणार आहे. मात्र, वीस दिवसांचा कालावधी उरला असतानाही मच्छिमारांची बोटी दुरुस्ती व तयारीसाठी लगबग सुरू झाली आहे. यामुळे करंजा, मोरा, कसारा, ससूनडॉक बंदरात हजारो मच्छिमारांची गर्दी झाली आहे.**

ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाळ्याच्या प्रारंभापासून खवळलेला समुद्र शांत होतो. नीरव, शांत झालेल्या सागरात मासेमारीसाठी पोषक वातावरण असते. खोल समुद्रातील मासेमारीसाठी मच्छिमारांना ५० ते ७० वाव खोल समुद्रात जावे लागते. त्यासाठी एका खेपेसाठी १० ते १२ दिवस खर्ची घालावे लागतात. खोल समुद्रातील मासेमारीच्या एक खेपेसाठी दीड ते दोन लाखांपर्यंत खर्च येतो. समुद्राच्या तळाशी असलेली सर्वच प्रकारची मासळी या पद्धतीत पकडली जाते. चांगल्या प्रतीची निर्यात करण्यायोगी असलेली मासळी खोल समुद्रातील मासेमारीत मिळत असल्याने या पद्धतीच्या मच्छिमारांची संख्या राज्यात सर्वाधिक आहे. त्यामुळे ५० ते ७० वाव खोल समुद्रातील मासेमारीसाठी २० दिवसांआधीपासून तयारी सुरू झाली आहे. बोटींच्या डागडुजी, रंगरंगोटी, जाळींची दुरुस्ती, इंजिन आणि इतर तत्सम कामे करण्यासाठी मच्छिमारांची लगबग सुरू झाली आहे. यामुळे ससुनडॉक, करंजा, मोरा, कसारा आदी विविध बंदरात हजारो मच्छिमारांची गर्दी झाली आहे. पावसाळी ६१ दिवसांच्या बंदीनंतर एक ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या मासेमारीसाठी मच्छिमार आसुसलेले आहेत. यासाठी मच्छिमारांना शासनाकडून मिळणारा डिझेलचा कोटा वेळेतच उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी आतापासूनच बैठका घेऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मात्र, शासनाकडून वेळेत डिझेल कोटा मिळाला नाही तरी बाहेरून मिळणारे महागडे डिझेल खरेदी करून १ ऑगस्टपासून मासेमारीसाठी निघण्याची तयारीही मच्छिमारांची असल्याची माहिती करंजा मच्छिमार संस्थेचे माजी उपाध्यक्ष तथा व्यावसायिक रमेश नाखवा यांनी दिली.



# जिल्हास्तरीय नोडल अधिकारी कार्यशाळा

**। रायगड । वार्ताहर ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने (दि.१५) रेड रिबीन क्लबच्या संदर्भात आरआरसी नोडल अधिकारी जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील रेड रिबीन क्लबचे नोडल अधिकारी आणि जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील विविध पदाधिकारी यांनी उपस्थिती दर्शवली होती. जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे संजय माने यांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित असलेल्या सर्वांना मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. टी.पी. मोकल, विभागीय समन्वयक प्रा.डॉ. प्रवीण गायकवाड आणि प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. रवींद्र पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनामधून रेड रिबीन क्लबसंदर्भात माहिती सांगितली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी सदरील कार्यशाळेचे अध्यक्षीय भाषण केले.या कार्यशाळेला जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील रवींद्र कदम, संपदा मलेकर, रुपेश पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. निशिकांत कोळसे, क्रीडा अधिकारी प्रा. तेजेश म्हात्रे, प्रा. श्वेतल झिंजे, प्रा. कपिल जोशी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी तसेच रेड रिबन क्लबचे नोडल अधिकारी प्रा. दिनेश पाटील यांनी केले.

पान १ वरून

## शेतकऱ्यांची थट्टा

नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरिता विमा संरक्षण देण्यासाठी रायगड जिल्ह्यामध्ये २०२४-२५ या कालावधीत खरीप हंगामात पीक विमा योजना राबविण्यात आली. शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून विम्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. रायगड जिल्ह्यामध्ये चोलामंडलम एम.एस. जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात आली. रायगड जिल्ह्यासाठी भातपिकाला विमा संरक्षित रक्कम ५१ हजार ७६० रुपये असून, नाचणी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम २० हजार रुपये आहे. ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंदणी करणे, या योजनेंतर्गत भातासाठी केवळ एक रुपयात जवळजवळ ५० हजार रुपये पीक विमा संरक्षणाचा लाभ देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. रायगड जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, याकरिता कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविली होती.

या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२४ करिता २० हजार ९३.१४ हेक्टर क्षेत्रासाठी ४० हजार ३४७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली. अतिवृष्टी व इतर कारणांमुळे झालेल्या नुकसानीमध्ये एक हजार ८२० शेतकरी विम्यासाठी पात्र ठरले. या शेतकऱ्यांचा विमा मंजूर करण्यात आला. त्यासाठी एक कोटी ३२ लाख १० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. एक हजार ८२० शेतकऱ्यांपैकी ६४८ शेतकऱ्यांना विम्याचे पैसे देण्यात आले. एकूण ४३ लाख रुपयांचा निधी या शेतकऱ्यांना वाटप करण्यात आला. २०२४ चा खरीप हंगाम संपून २०२५चा खरीप हंगाम सुरू झाला आहे. मात्र, अजूनपर्यंत पात्र असलेले एक हजार १७२ शेतकरी विम्याच्या रकमेपासून वंचित असल्याचा प्रकार समोर आला आहे. या शेतकऱ्यांना विम्याचे पैसे देण्याची कार्यवाही सुरु असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

## सीसीटीव्हीच्या दुरुस्तीचा सीओंना विसर

का होत नाही, असा सवाल देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

सीसीटीव्ही कॅमेरे अजून का चालू नाही, असा प्रश्न उपस्थित करीत नगरपरिषद प्रशासनाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशमुख यांच्या प्रश्नाचे उत्तर देताना, शहरी भागात बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची देखभाल दुरुस्तीचे कंत्राट नगरपरिषदेने कंत्राटदार कंपन्यांना दिले आहे. दुरुस्ती करण्यासाठी पोलीस अधीक्षक रायगड यांच्याकडून वेळोवेळी कळविण्यात आले आहे. कॅमेरे त्वरित सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## अंबा नदीत आदिवासी महिलेची उडी

विक्रांत कोंबिले, प्रशांत दोडामनी, भरत मालुसरे, श्वेता विश्वकर्मा, विजया मगर, कृतिका वारंगे, श्रावण भोई, अनुप देशमुख, अजय भोकटे, दामेश तांबट, शरद दिसले, सचिन येवले हे १३ जण असे सर्व १५ जण मिळून सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास महिलेचा शोध घेण्यासाठी निघाले. मात्र, अंबा नदीच्या पात्रात खूप दूरवर जाऊनही आणि सुमारे दीड तासाच्या शोधमोहिमेनंतरही ही महिला सापडली नाही. या महिलेचा शोध घेण्यासाठी अजून दोन छोट्या बोटी आणि ड्रोन कॅमेरा मागविण्यात आले असून, ही महिला सापडेपर्यंत शोधमोहीम सुरूच राहणार असल्याचे सचिन कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे.

## जिल्ह्यात ‘१०८’ सुसाट

मोठ्या शहरांमधील रुग्णालयांमध्ये उपचारासाठी जावा लागते. त्याचा आर्थिक फटका रुग्णांना मोठ्या प्रमाणात बसतो. वेळेवर रुग्णवाहिका तसेच अन्य वाहनांची सुविधा मिळत नसल्याने रुग्णांवर उपचार होताना अडचणी निर्माण होतात. त्यामध्ये खडतर रस्ते, अरुंद रस्त्यांच्या अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे.

रस्ते अपघातात जखमी झालेले, नैसर्गिक आपत्तीत सापडलेले, आत्महत्या केलेले, गंभीर आजाराने त्रस्त असलेले अशा वेगवेगळ्या कारणांमुळे प्रकृती बिघाडलेल्या रुग्णांवर तातडीने उपचार व्हावे, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका सुरु करण्यात आली. रुग्णावर तातडीने उपचार व्हावे यासाठी सरकारने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजनेखाली १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकामार्फत तातडीची वैद्यकीय सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. रायगड जिल्ह्यामध्ये ही सेवा २०१४ पासून सुरु झाली. रायगड जिल्ह्यासाठी शासनाकडून २३ रुग्णवाहिका देण्यात आल्या. या रुग्णवाहिकेमध्ये अन्य आरोग्य सुविधांसह डॉक्टरही उपलब्ध करण्यात आले. १०८ क्रमांकावर संपर्क साधल्यास काही मिनिटात रुग्णवाहिकेच्या माध्यमातून रुग्णांना रुग्णालयात उपचारासाठी नेण्याचे काम केले जाते. बीव्हीजी कंपनीद्वारे या रुग्णवाहिकांवर नियंत्रण ठेवले जाते. रायगड जिल्ह्यात या कंपनीचा एक व्यवस्थापक म्हणून काम पाहात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यामध्ये १०८ रुग्णवाहिकेचे कामकाज चालत आहे. दर दिवशी रुग्णवाहिका सुमारे दोनशे किलोमीटरचा प्रवास करीत आहेत. त्यात मुंबईला रुग्णांना नेणे, जिल्ह्यातील जिल्हा, उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठविणे, अशा अनेक प्रकारची कामे रुग्णवाहिकेच्या मदतीने केली जात आहेत. अकरा वर्षांमध्ये १०८ रुग्णवाहिकेने एक लाख ५० हजार १२७ रुग्णांना सेवा दिली आहे. त्यामध्ये भाजलेले, वाहन अपघात झालेले. आत्महत्या करणारे, गंभीर दुखापत झालेले, तसेच इतर वैद्यकिय मदतीसाठी तातडीने अन्य रुग्णालयात नेण्याचे काम रुग्णवाहिकेने केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राची जीवनदायी म्हणून १०८ रुग्णवाहिकेकडे पाहिले जाते.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग निसरडा

असून, ही सगळी अपघातग्रस्त वाहने बाजूला घेऊन द्रुतगती मार्ग वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला.या द्रुतगती मार्गावर बोरघाटात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी जाऊन तो निसरडा होऊन अनेक अपघात झाले आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आयआरबी यंत्रेणेने उपाययोजना करण्याची गरज आहे, अशा प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहेत.

## भरदिवसा घरफोडीत १८ तोळे सोन्याची चोरी

झाल्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले, मात्र नेहमीप्रमाणे पुढील तपास सुरू आहे. या औपचारिक वाक्यापलीकडे काहीच घडलेले नाही.

दीपराज ठाकूर हे सीव्ही प्रा. लि. कंपनीत कार्यरत असून, त्यांची पत्नी पूनम ठाकूर या उरण एज्युकेशन सोसायटी शाळेत शिक्षिका आहेत. दोघेही कामावर व मुलगा शाळेत गेल्यानंतर घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी चोरी केली.

## वडिलांचा मुलाच्या गळ्यावर ब्लेडने वार

अमोल याला दारूचे गंभीर व्यसन जडल्याने तो दररोज दारू पिऊन घरात आई-वडिलांशी भांडण काढत होता. तसेच त्यांना मारहाणही करीत होता. त्यामुळे त्याच्या त्रासाला त्याचे आई-वडील कंटाळले होते. वडील जाधव हे रात्री वॉचमन म्हणून काम करतात. ते रात्रीपाळी करून सकाळी घरी आले होते. यावेळी त्यांची पत्नी घरकामासाठी निघून गेली. तर, अमोल पलंगावर झोपला होता. दरम्यान, रवींद्र हे जेवण घेण्यासाठी किचनमध्ये गेले असता, भांड्यांचा आवाज झाल्याने अमोल जागा झाला. त्यावर दारूच्या नशेत असलेल्या अमोल याने रवींद्र यांना घरातून निघून जा, असे जोरजोरात सांगून त्यांना शिवीगाळ करू लागला. त्यानंतर त्याने रवींद्र यांना मारहाणही केली. यावेळी ‘मी घराचे भाडे भरतोय, तूच घराबाहेर जा’, असे रवींद्र यांनी अमोलला बजावले. त्यामुळे चिडलेल्या अमोलने त्यांना पुन्हा मारहाण सुरू केली. त्यामुळे चिडलेल्या रवींद्र यांनी मागचा-पुढचा कसलाच विचार न करता घरातील दाढी करण्याचे ब्लेड उचलले व अमोलच्या गळ्यावर वार करून त्याला जखमी केले. या घटनेत अमोल गंभीर जखमी झाल्याने त्याला कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या प्रकरणाची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी रवींद्र यांच्याविरोधात गुन्हा नोंद करून त्यांना अटक केली.

## मुख्याध्यापकाची विद्यार्थ्यांना मारहाण

याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनी कोणतीही तक्रार केली नाही. ही घटना समजताच आदिवासी संघटनेचे कार्यकर्ते आश्रमशाळेत आले. त्यांनी मुख्याध्यापक बनसोडे यांच्याकडून घटनेची माहिती घेतली. सर्व परिस्थिती त्यांच्याही लक्षात आली. बनसोडे यांनी मी विद्यार्थ्यांना दोन दोन छड्या मारल्या. ही माझ्याकडून चूक झाली. कोणताही रोष ठेवून मी मारले नाही. मुलांना शिस्त लागावी. त्यांनी गैरवर्तन करू नये म्हणून माझ्याकडून हे घडले, असे स्पष्ट केले. तसेच विद्यार्थ्यांनीही चूक मान्य करून पुन्हा असे प्रकार करणार नाही, असे सांगितले.




# सुधागडात ३३ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये सरपंच पदाच्या आरक्षणाची प्रक्रिया मंगळवारी (ता.१५) पाली भक्त निवास क्रमांक १ येथे पार पडली. तहसीलदार सुधागड उत्तम कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत ग्रामपंचायतींना प्रवर्ग निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले.

अनुसूचित जाती (महिला): परळी, अनुसूचित जमाती: महागाव, पाच्छापुर, राबगाव, कळंब, कुंभारशेत. अनुसूचित जमाती (महिला): आपटवणे, नेणवली, चिवे, माणगाव बु., खवली, नांदगाव. नामाप्र: गोमाशी, रासळ, सिध्देश्वर बुद्रुक, शिळोशी. नामाप्र (महिला): आतोणे, नवघर, वऱ्हाड जांभुळपाडा, चंदरगाव, चिखलगाव. सर्वसाधारण: नागशेत, उध्दर, अडूळसे, ताडगाव, खांडपोली, घोटवडे, नाडसूर. सर्वसाधारण (महिला): तिवरे, भाजे, हातोंड, दहिगाव, वाघोशी.

# खोपटा-कोप्रोली रस्त्याचे काम सुरू



**। उरण । प्रतिनिधी ।**

खड्ड्यांनी भरलेल्या आणि जनतेच्या नाकीनऊ आणलेल्या खोपटा-कोप्रोली रस्त्याच्या दुरवस्थेवर अखेर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाला झुकवावं लागलं. गेली दोन वर्षे रखडलेल्या या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाला बुधवार, दि. १६ जुलै रोजी अखेर सुरुवात झाली.

बुधवारी सकाळीच खोपटा पुलाच्या खाली शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तालुकाप्रमुख संतोष ठाकूर व तालुका संघटक बी.एन. डाकी यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत रास्ता रोकोचा इशारा दिला. प्रशासनाला खडबडून जागं करत शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजीकेली. या आंदोलनात माजी तालुका प्रमुख राजीव म्हात्रे, चिरनेर सरपंच भास्कर मोकल, कोप्रोली शाखाप्रमुख रवी म्हात्रे, खोपटे शाखाप्रमुख नंदकुमार ठाकूर यांच्यासह रितेश ठाकूर, गणेश म्हात्रे, जयंत म्हात्रे, प्रांजल पाटील, लक्ष्मण ठाकूर, गजानन वशेणीकर, दीपक म्हात्रे, महेश कोळी आदींचा उत्स्फूर्त सहभाग होता.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे ढोकशेत ता.सुधागड, जि.रायगड येथील जमीन मिळकत.**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.अभिजित शामराव जेधे | ३५२/१ | ०-६०-० | ०-२६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लिएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दहा दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- १७/०७/२०२५
खरेदी घेणार
१) श्री.ताहेर बदरूदिन ताबांवाला
२) श्रीम.रशिदा ताहेर ताबांवाला
३) श्री.अब्दुलकादेर ताहेर ताबांवाला
सर्व रा.वाशी, नवी मुंबई
मो.७२६२०९७६९९

सही/-
खरेदीदारांचे लेखक
**श्री. राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं.७
पाली ता.सुधागड, जि.रायगड.
मो.९०२८६३५२३७/९२२५५१५४१५

### जाहीर नोटीस

दिनांक १६/०७/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे वडवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री.पंडीत दगडू भंडलकर | २८/१/क | एकुण क्षेत्र ०.४७.३० पैकी लिहुन देणार यांच्या हिश्याची मिळकत ०.२०.०० | १.०८ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्ट, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. पुजा प्रताप सुर्वे**
रा.पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९२७१८७६०५०

### जाहीर नोटीस

दिनांक १७/०७/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल श्रीमती रोहिणी गोविंद भोईर यांनी मौजे सालवड, ता.कर्जत,जि.रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. विजेंद्र गणेश पाटील | ५९/१/अ | ०-२०-०० | ०-२० |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

### आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग, जि. रायगड.

**- २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना :-**
**( फक्त सभासदांसाठी )**

सप्रेम नमस्कार,

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता पी.एन.पी. नाट्यगृह, बायपास रोड, चेंढरे ता.अलिबाग, जि.रायगड या ठिकाणी खालील विषयांचा विचार करण्या करीता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ (अ) मधील तरतूदीनुसार सर्व सभासदांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणे बंधनकारक असल्याने सर्व सभासदांसाठी वार्षिक सभा सुरु होण्यापूर्वी याच ठिकाणी दुपारी ३ ते ४ या वेळेत प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. तरी सर्व सभासदांनी दुपारी ३ वाजता सभेच्या ठिकाणी उपस्थित रहावे, प्रशिक्षणा नंतर ठिक ४.०० वाजता सभेला सुरुवात होईल,

**-: सभेपुढील विषय :-**

१. मागील दि. १० ऑगस्ट २०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि.३१ मार्च २०२५ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या निव्वळ नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
४. सन २०२५-२६ या सालाकरिता अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२४-२५ या सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२४-२५ या सालाचा वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला तपासणी अहवाल वाचून नोंद घेणे व स्विकृत करणे.
६. सन २०२५-२६ या सालाकरीता अंतर्गत हिशोबतपासणीस व वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे
७. मागील वर्षांच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे व त्यास मंजूरी देणे,
८. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजूरी देणे.
१०. प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणूक/वसूली इत्यादी तत्सम विषयांच्या आर्थिक धोरणांना मान्यता देणे.
११. संस्थेच्या रामराज शाखेसाठी खरेदी करण्यांत आलेल्या एन.ए.प्लॉट वर बांधकाम करण्यास मंजूरी देणे.
१२. संस्थेच्या पिंपळभाट व पोयनाड शाखेसाठी जागा खरेदी करणेस मंजूरी देणे.
१३. नियम ४९ नूसार निर्लेखन कर्जास मान्यता देणे.
१४. सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या पुणे या संस्थेचे आदर्श पतसंस्थेमध्ये विलिनीकरण करणे बाबत आलेल्या प्रस्तावावर विचार करून मंजूरी देणे.
१५. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ :- अलिबाग
दिनांक :- १७/०७/२०२५

सभासद प्रशिक्षण
वार्षिक सभा सुरू होण्यापूर्वी याच ठिकाणी दु. ०३ ते ०४ या वेळेत सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. कृपया सभासदांनी दु.०३.०० वाजता उपस्थित रहावे. यानंतर लगेचच वार्षिक सभेचे कामकाज सुरू होईल.

सही/-
**मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
**(सौ.मीनाक्षी शामसुंदर पाटील )**
**कार्यलक्षी संचालिका**
**आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,अलिबाग**

**-: सूचना :-**

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्धा तास उशिरा म्हणजेच सायं. ४.३० वाजता घेतली जाईल व या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांनी अजूनही आपले मोबाईल क्रमांक संस्थेकडे नोंदविले नाहीत किंवा ज्यांचे मोबाईल नंबर बदलले आहेत अशा सभासदांनी कृपया संस्थेच्या जवळच्या शाखेमध्ये संपर्क करून आपले मोबाईल नंबर अपडेट करणे व आपली केवायसी अपडेट करण्यास विनंती.
३. सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान आठ दिवस अगोदर पाठवाव्यात.

# नेरळ-पेशवाई रस्त्याविरोधात एल्गार

## ■ २० जुलै रोजी रस्ता रोकोचा इशारा

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील नेरळ-पेशवाई रस्त्याची खड्ड्यांमुळे अंत्यत दयनिय अवस्था झाली आहे. त्यामुळे विध्यार्थी, प्रवासी, वाहन चालक तसेच या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या रूग्णांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत अनेक वेळा लोकप्रतिनिधी तसेच बांधकाम विभागाकडे लेखी तक्रारी करूनही ते याकडे दुर्लक्ष करत असल्याची चर्चा नेरळमध्ये होत आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते गोरख शेप यांनी २० जुलै रोजी नेरळ साईमंदिर चौक येथे रस्ता रोको आंदोलनाचा करणार असल्याचा इशारा त्यांनी पत्रकार परिषेत दिला आहे.




नेरळ-पेशवाई हा रस्ता कर्जत-कल्याण या मुख्य राज्यमार्गाला जाऊन मिळतो. परंतु, गेली अनेक वर्ष हा रस्ता खड्डेमय झाला आहे. या रस्त्याची कोणत्याही प्रकारची दुरूस्ती प्रशासनाकडून केली जात नाही. अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार करूनही उपयोजना होत नाही. या खड्डेमय रस्त्यामुळे अनेक वेळा अपघात झाले आहेत. हे अपघात तसेच नेरळ शहरातील वाहतुक कोंडी रोखण्यासाठी हा रस्ता दुरूस्त होणे गरजेचे आहे. हा रस्ता झाल्यास नेरळ रेल्वे गेटमधील वाहतुक कोंडी कमी होईल, विध्यार्थी शाळेत वेळेत पोहचतील व रूग्णांना देखील मनस्ताप सहन करावा लागणार नाही. वेळोवेळी हे संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देखील त्याच्यांकडून उपायोजना होत नाहीत. त्यांच्याकडून जाणून बुजून या रस्त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा अरोप स्थानिकांमधून होत आहे. त्यामुळे नेरळमधाल सामाजिक कार्यकर्ते गोरख शेप यांनी २० जुलै रोजी नेरळ साईमंदिर येथे रस्ता रोको करणार असल्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

> अनेक वर्ष लोकप्रतिधिनी आणि अधिकाऱ्यांच्या निदर्शनात आणूनही तसेच लेखी पत्र व्यवहार करूनही झोपलेले लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांना जागे करण्याठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. जेणेकरून यानंतर हा रस्ता चांगल्या दर्जाचा होईल, अशी अपेक्षा आहे. या आंदोलनात सर्व सामन्य नागरिक, प्रवासी, वाहनचालक यांनी देखील या आंदोलनात सामील व्हावे.
> – गोरख शेप, सामाजिक कार्यकर्ते, नेरळ

# अलिबाग-पेण रस्त्याची दुरवस्था

■ निवडणूकांवेळी लोकप्रतिनिधी यांच्याकडून गोडगोड थापा
■ निवडून आल्यावर खड्ड्यात घातली जनता

। अलिबाग । वार्ताहर ।

अलिबाग-वडखळ मार्गाची अवस्था दिवसेंदिवस अधिकच दयनीय होत चालली आहे. या रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून, प्रवासी जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. वाहनधारकांचा त्रास तर वाढलाच आहे, मात्र सामान्य नागरिकांचा संयमही आता संपत चालला आहे. निवडणूकींच्या आधी विकासाचे गोडगोड आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे 'अपना काम बनता, खड्ड्यात जावो जनता' अशी त्या लोकप्रतिनिधींची भावना झाल्याची चर्चा जोर धरत आहे.

अलिबाग-पेण मार्गाच्या चौपदरी कारणाचा प्रस्ताव काही वर्षांपूर्वी आला होता. प्रकल्पाला येणारा खर्च परवडत नसल्याच्या कारणावरून तो बासनात गुंडाळण्यात आला. रस्त्यावर पडलेला प्रत्येक खड्डा पार करताना वाहन चालकांना प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणारा प्रत्येक प्रवासी हा मतदार असूनही लोकप्रतिनिधी त्यांच्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत, असा संताप प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे. तसेच, दर निवडणुकीत रस्त्यांचे, विकासाचे गोडगोड आश्वासन देणारे लोकप्रतिनिधी आता मात्र गायब झाले आहेत, अशी भावना देखील स्थानिक जनतेत आहे.

मुळात हा रस्ता शासनाच्या कुठल्या विभागाकडे आहे, हेच शासनाला माहिती नाही. सर्वच विभाग याबाबत टोलवाटोलवी करत आले आहेत. त्यामुळे या रस्त्याचे चौपदरीकरण दूरच राहिले, किमान रस्त्याची डागडुजी तरी करा. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी त्वरित लक्ष देऊन या मार्गाची डागडुजी व डांबरीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू करावे, अन्यथा जनतेच्या रोषाचा सामना करावा लागेल. सामान्य जनतेची मानसिक स्थिती बदलून त्याच्याकडून काहीतरी अघटीत घडण्याआधी किमान या रस्त्याची डागडुजी होईल, अशी अपेक्षा स्थानिकांसह प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.



## निवडक

### डेरवलीतील विवाहिता बेपत्ता

**पनवेल** : राहत्या घरातून एक विवाहिता कोठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. विनिता मदन जोशी (३३) असे या महिलेचे नाव असून त्या डेरवली येथील रहिवाशी आहेत. त्यांची उंची ५फूट ३ इंच, बांधा मध्यम, नाक सरळ, डोळे काळे, केस लहान काळे, रंग सावळा असून अंगात निळ्या रंगाची जीन्स व चेक्स काळ्या व हिरव्या रंगाचा शर्ट, पायात गुलाबी रंगाचे बूट, सोबत दोन बॅग गुलाबी व काळ्या रंगाची ट्रॉली बॅग, काळ्या रंगाची सॅक व सोबत मोबाईल फोन आहे. या महिले बाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार भीमाशंकर होलगीर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### डेब्रीज डम्परवर सिडकोची कारवाई

**पनवेल** : नवीन पनवेल येथील सेक्टर-१७ भागातील सिडकोच्या भूखंडात डेब्रिज टाकण्यासाठी डम्पर आल्याची माहिती सिडकोच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार सिडकोच्या पथकाने या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, त्या ठिकाणी डम्पर चालक गुड्डू कुमार बडनसिंग डेब्रिज टाकण्याच्या प्रयत्नात असल्याचे आढळून आले. त्यामुळे सिडकोच्या पथकाने कामोठे पोलिसांच्या मदतीने डेब्रिजने भरलेल्या डम्पर व त्यावरील चालक गुड्डू कुमार बडनसिंग (२५) याला ताब्यात घेतले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात डम्पर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रिज टाकत असताना नागरिकांना कोणी आढळल्यास त्यांनी त्याची माहिती त्वरित जवळच्या पोलीस ठाण्याला किंवा सिडको कार्यालयात द्यावी, असे आवाहन केले आहे.




### कर्जत येथील उल्हास नदीत सापडला वृद्ध महिलेचा मृतदेह

**कर्जत** : कर्जत शहराच्या कडेने वाहणाऱ्या उल्हास नदीत मंगळवारी (दि.१५) सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास पोसरी गावानजिक महिलेचा मृतदेह स्थानिकांना दिसला होता. त्यांनी ही माहिती पोलिसांना दिली. कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने हा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला असून कर्जत उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी नेण्यात आला. या महिलेचे नाव विजया अनिल काळोखे असे आहे. ती कर्जत मुद्रे येथील नेमिनाथ सोसायटी येथे राहणारी आहे. कर्जत पोलीस ठाण्यात या महिलेची बेपत्ता असल्याची तक्रार दाखल होती.

# उलवेतील पाणीप्रश्न सोडविण्याची मागणी

। उरण । प्रतिनिधी ।

उलवे नोडमधील पाण्याच्या प्रश्न मार्गी लागावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते सचिन राजे येरुणकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिकडकोचे ॲडीशनल चीफ इंजिनिअर पि.एस. फुलारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले आहे.



उलवे मधील वाढती लोक वस्ती व लोकसंख्या पाहता उलवे नोडमध्ये खूप कमी प्रमाणत पाणी येत आहे. त्यामुळे रहिवाश्यांना मोठ्या पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. येथे मोठंमोठे टॉवर उभारले गेले आहेत. त्यामुळे त्यांना जास्त प्रमाणत पाणी जाते. त्यामुळे येथील छोट्या सोसायटीला पुरेसे पाणी मिळत नाही. तर, काही सोसायट्यांना अजिबातच पाणी मिळत नाही. त्यांना शसनामार्फत टँकरने पाणी पुरवले जाते. मात्र, तो ही टँकर नियमित येत नाही. तसेच, जावळे गाव हा पूर्ण सिडकोच्या अंतर्गत येतो आणि हा पट्टा जास्त प्रमाणत टेकडीचा भाग आहे. त्यामुळे त्या भागात देखील पाणी वर चढत नाही. तसेच, १५ ते १७ या सेक्टरमध्ये पाईप लाईन फिरून जात असल्यामुळे छोट्या सोसायटीपर्यंत पाणी पोहोचत नाही. बामणडोंगरी स्टेशन समोरील बिल्डिंगमध्येही पाणीपुरवठा होत नाही. या सर्व समस्या सुटाव्यात म्हणून सामाजिक कार्यकर्ते सचिन राजे येरुणकर यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रकांत बाकळकर, गजानन जाधव, साई पैकडे, शशिकांत कांबळे आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी सिडकोचे ॲडीशनल चीफ इंजिनिअर पि.एस. फुलारी यांची भेट घेऊन यावर काही उपाय योजना सुचविले आहेत. त्या उपाययोजनाची अंमलबजावणी केली जावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# गाडीचा टायर फुटून अपघात

। पनवेल । वार्ताहर ।

मुंबई-पुणे महामार्गावर खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गाडीचा टायर फुटून अपघात झाला आहे. गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी पलटी होऊन हा अपघात झाला असून गाडीतील ५ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातातील वाहनचालक बजरंग शर्मा (२७) अपघाताच्या ठिकाणी आले असता त्यांच्या कारचा पुढील डाव्या बाजूचा टायर फुटला. त्यामुळे त्यांचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी पहिल्या लेनला पलटी झाली. या अपघातामध्ये गाडीतील ममता शर्मा (२६), कमलादेवी शर्मा (६५) शांती शर्मा (४५), माही शर्मा (३) व अंशुमन शर्मा (६ महिने) हे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



## उपचारादरम्यान मनोरुग्णाचा मृत्यू

**पनवेल** : रुग्णालयात उपचारादरम्यान मनोरुग्णाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सुधीर खैरे (७०) असे मनोरुग्णाचे नाव आहे. त्यांच्यावर ठाण्यातील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. मात्र, त्यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार चेतन पाटील करीत आहेत.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत सोमवारी (दि.१४) वरसोली येथील ग्रामपंचायतीमधील सभागृहात चर्चा झाली. या चर्चेत कर्मचाऱ्यांनी विविध प्रश्नांबाबत आपले मत व्यक्त केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी कर्मचाऱ्यांचे प्रश्न ऐकून घेऊन प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. ही सभा सकारात्मक चर्चेतून पार पडली असल्याची माहिती ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी दिली.



जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, जिल्ह्यातील गटविकास अधिकारी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेची जिल्हा कार्यकारिणी यांची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे यांनी संघटनेकडून दिलेल्या निवेदनावर आपली रितसर बाजू मांडून कर्मचाऱ्यांवर होणारा अन्यायाबाबत माहिती दिली. वेगवेगळ्या प्रलंबित प्रश्नांबरोबरच तालुक्यातील कर्मचारी यांच्या थकीत किमान वेतन, रहाणीमान भत्ता, पी.एफ, अपूर्ण सेवा पुस्तक, आठवडा सुट्टी या सर्व तक्रारीचा पाढा वाचून दाखविला. गटविकास अधिकारी यांच्याकडे सर्व तक्रारीचा अहवाल तयार करण्यात यावा. गटविकास अधिकारी यांच्याकडे तो अहवाल पाठवून त्याची पुर्तता विनाविलंब करण्याची कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन भोसले यांनी दिले.

# उरणमध्ये डेंग्यूच्या रूग्णांत वाढ

। चिरनेर । प्रतिनिधी ।

बदलत्या वातावरणामुळे उरण शहर आणि तालुक्यातील ग्रामीण भागात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. यातील अनेक रुग्ण हे खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. उरण तालुक्यात डेंग्यू आणि व्हायरल तापाची साथ आली आल्याची माहिती उरण तालुका अधिकाऱ्यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.




गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारली होती. त्यानंतर आता पावसाने पुन्हा चांगला जोर धरला आहे. शहरात आणि ग्रामीण भागात अनेक ठिकाणी साचणारे पाणी आणि मोठ्या प्रमाणावर असलेले कचऱ्याचे ढीग यामुळे डासांचा त्रास वाढला आहे. त्यामुळे तालुक्यात डेंग्यूच्या रुग्ण संख्येत वाढ झाली आहे. नागरिकांना पाण्याची भांडी कोरडी करण्याच्या व स्वच्छता राखण्याच्या सूचना तसेच ग्रामपंचायतींना सार्वजनिक गटारांची साफसफाई व फॉगिंग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या संदर्भात एक बैठकीही घेण्यात आली असून, लवकरच कारवाई केली जाईल, असे उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र ईटकरे यांनी सांगितले आहे.

# जिवंत विद्युत वाहक केबल पडली

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

चौक बाजार पेठेतील एमएसईबीची असलेली विद्युत वाहक केबल तुटल्यामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यातच पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे हा धोका गंभीर असतो. मात्र, या ठिकाणी असलेले सामाजिक कार्यकर्ते गणेश कदम यांच्या सतर्कमुळे होणारा अपघात टळला आहे. त्यांनी तातडीने विज पुरवठा कार्यालयाला संपर्क करुन विज पुरवठा खंडीत करण्यात आला.



नुकतेच चौक येथील विजेचा लपंडाव सुरु असून भिंगारी तसेच चौक येथील कार्यालयात जाऊन समस्यांचा पाढा वाचण्यात आला. मात्र, त्यावर कोणतीही उपाय योजना झाली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या ठिकाणी विद्युत वाहक केबल जिर्ण झाल्यामुळे त्या तुटून जमिनीवर पडण्याच्या घटना सतत घडत असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, चौक ही जुनी बाजार पेठ असल्यामुळे या ठिकाणी शेकडोहून अधिक जण येत असतात. त्यातच येथे असलेले जय हिंद स्टोअर समोरच्या समोर ही विद्युत वाहीनी तुटली असल्यामुळे काही काळ नागरिकांच्या मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## औषधाच्या दुकानातून १७ हजारांची चोरी

। पनवेल । वार्ताहर ।

औषधाच्या दुकानाचे शटर तोडून आत शिरलेल्या चोरट्याने गल्ल्यातून १७ हजार रुपये आणि काही औषधे चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद केला आहे. हर्ष नावंधर यांचे नवीन पनवेल सेक्टर १५ अ येथे जनरिक मेडिको नावाचे औषधाचे दुकान आहे. त्यांच्या मेडिकलमध्ये चोरी झाल्याचे त्यांना समजल्यानंतर त्यांनी या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

दुबार भात रोपांची पेरणी | सर्वत्र शेतात चांगले पाणी

# उरण तालुक्यात भात लावणीच्या कामांना वेग

। चिरनेर । प्रतिनिधी ।

दोन दिवसांपासून बरसत असलेल्या पावसामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असून, शेतीच्या कामांना वेग आला आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील शेतकरी व महिलावर्ग भात लावणीच्या कामात गुंतला आहे. पूर्वी भात लावणीची कामे करत असताना, विरंगुळा म्हणून पारंपारिक गाणी म्हटली जात होती. या गाण्यांना 'आंबोळ्या' असे संबोधले जात होते. मात्र, या आंबोळ्यांचा सूर आता खलाट्यांमध्ये हरवला आहे.



उरण व पनवेल तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, साई, दिघाटी, नागाव, केगाव, चाणजे या गावातील परिसरात भात लावणीच्या कामांना सुरुवात झाली आहे. सुरुवातीला पावसाने रायगडकरांना झोडपून काढले होते. त्यामुळे भात पेरणीची कामे व्यवस्थितरित्या न झाल्यामुळे भातरोपांची उगवण हि चांगल्या प्रकारे झाली नव्हती. त्यामुळे रोपे देखील कमकुवत झाली होती. त्यानंतर शेतकऱ्यांनी दुबार भात रोपांची पेरणी करून, सध्या लावणी योग्य अशी रोपे तयार केली आहेत. त्यानंतर पावसाने विश्रांती घेतल्यामुळे अधूनमधून पडणाऱ्या किरकोळ सरींमुळे भातरोपांनी तग धरून ठेवला होता. अशा अवस्थेत भातरोपांची स्थिती असतानाच, पावसाने जिल्ह्यात हजेरी लावून बरसायला सुरुवात केली. त्यामुळे सर्वत्र शेतात चांगले पाणी झाले आहे. शेतीच्या कामांना वेग आला आहे.

### आंबोळ्याचे सुर खलाट्यांमध्ये हरवले

**आता भात रोपांची चांगली वाढ झाली आहे. चिखलणीसाठी जमीन हलकी झाल्याने शेतकऱ्यांनी नांगरणी करून भातरोपांच्या लावणीलाही सुरुवात केली आहे. उरण, पनवेल तालुक्यातील महिलावर्ग सध्या लावणीच्या कामात मग्न झाला आहे. पूर्वी लावणीची कामे करत असताना विरूंगळा म्हणून पारंपरिक गाणी गाऊन, त्यातून देवाची आळवणी केली जात होती. अशा गाण्यांना 'आंबोळ्या' असे संबोधले जाते. परंतु, या आंबोळ्यांचे सूर आता खलाट्यांमध्ये ऐकू येत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.**

# ट्रक हातावरून गेल्याने तरुण जखमी

। पनवेल । वार्ताहर ।

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत आणि त्यातच रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे पादचाऱ्यांसह दुचाकीस्वारांचा गंभीर स्वरूपात अपघात होत आहेत. अशीच एक घटना पनवेलमधील एमआयडीसी भागात घडली आहे. येथील रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकी घसरली व ३३ वर्षीय दुचाकीस्वार रस्त्यावर पडला. याच वेळी शेजारुन भारत गॅस कंपनीचा ट्रक या तरुणाच्या हातावरून गेल्याने दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना घडली आहे. प्रणव ठाकूर असे या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी ट्रक चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रणव ठाकूर हा रोडपाली येथे राहत असून रात्री साडेदहा वाजता तळोजा एमआयडीसी येथे दुचाकीवर जात होता. दरम्यान, पाऊस पडत असल्याने रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्याचा त्याला अंदाज न आल्याने त्याची दुचाकी खड्ड्यात घसरुन तो खाली पडला. यावेळी वेगाने आलेल्या भारत गॅस ट्रकचे चाक त्यांच्या उजव्या हातावरून गेले आणि तो गंभीर जखमी झाला. या घटनेनंतर ट्रक चालक पळून गेला. या प्रकरणी ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू आहे.

# फौजासिंग नावाची प्रेरणा

फौजासिंग नावाचा एक शीख तब्बल ११४ वर्षांचे विलक्षण आयुष्य जगला. काल त्याचा अपघाती मृत्यू झाला नसता तर तो कदाचित आणखी कित्येक वर्षे आपल्यात असता. वयाच्या शंभरीमध्ये मॅरेथॉन शर्यत धावणारे व विक्रमी वेळेत पूर्ण करणारे फौजासिंग म्हणजे आरोग्यपूर्ण जीवनाचा अत्युच्च आदर्श म्हणायला हवेत. अखेरपर्यंत त्यांची चालण्याची व पळण्याची जिद्द जागी होती. परवा आपल्या घराजवळच्या हायवेवरून चालत जात असतानाच एका वाहनाने धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांची जगण्याची उमेद व ताठ शरीर पाहता ११४ व्या वर्षी असला तरी हा मृत्यू अकालीच झाला असे अनेकांना वाटले. अर्थातच त्यांच्या निधनाबद्दल जगभरातून शोक व्यक्त झाला. पण त्याच्या आयुष्यातून मिळणारी प्रेरणा आणखी कित्येक पिढ्यांपर्यंत टिकून राहील यात शंका नाही. फौजासिंग हे कोणी लेखक, कवी, नट किंवा क्रिकेटपटू नव्हते. ते अत्यंत साधे छोटे धाबा चालवणारे गृहस्थ होते. पण त्यांचा जीवनपट हा एखाद्या चित्रपटाहून सुरस आहे. फौजा यांनी वयाची आठ दशके कोणाही सामान्य शिखाप्रमाणे नेहमीचे आयुष्य काढले. पण वयाच्या ऐशीव्या वर्षी त्यांचे जीवन बदलून गेले. आधी त्यांची पत्नी ग्यान कौर वारली. नंतर आपल्या कुलदीपसिंग या मुलासाठी धाबा बांधत असताना त्याचे छप्पर पडून त्याचा मृत्यू झाला. आपल्या कुटुंबियांच्या या मृत्यूंमुळे फौजा यांचा जगण्यातला रस संपला. ते कित्येक तास स्मशानभूमीत जाऊन शोक करीत बसू लागले. त्यावेळी त्यांचा सर्वात मोठा मुलगा हरजिंदरसिंग याने त्यांना आपल्या लंडनच्या घरी नेले. इंग्लंडमध्ये गेली सुमारे दीडदोनशे वर्षे शीख नशीब काढायला जातात. त्यामुळे लंडनची काही उपनगरे म्हणजे शिखांच्या वस्त्या झाल्या आहेत. तेथे रेल्वे स्थानकांच्या नावाच्या पाट्याही गुरुमुखीमध्ये असतात. तेथे सरकारात अनेक उच्च पदांवर शिखांनी काम केले आहे. त्यामुळे इंग्लंड आणि कॅनडा हे पंजाब्यांसाठी जणू दुसरे घर असल्यासारखे झाले आहे. फौजा यांचे मन तेथे रमेल असे त्यांच्या मुलांना वाटले व तसेच झाले.

### नव्वदीत धावले मॅरेथॉन

तेथे स्थानिक गुरुद्वारामध्ये जाण्यासाठी बसने जात जा असे त्यांच्या मुलाने त्यांना सांगितले होते. पण मधल्या काळात लांबच लांब अंतरे चालण्याचा छंद फौजा यांना लागला होता. त्यानुसार ते बसऐवजी चालत गुरुद्वाराला जात. तिथे योगायोगाने फौजा यांची गाठ हरमिंदरसिंग नावाच्या एका नावाच्या धावपटूंसाठीच्या कोचशी झाली. त्यांच्या प्रभावामुळे त्यांनी मॅरेथॉन शर्यत धावण्याचा सराव सुरु केला. त्यानंतर अवघ्या सहा महिन्यांमध्ये एप्रिल २००० मध्ये झालेल्या मॅरेथॉनचे ४१ किलोमीटरचे अंतर त्यांनी ६ तास ५४ मिनिटांमध्ये पूर्ण केले. त्यांनी हा व पुढे असे बरेच विक्रम नोंदवले. पण त्यांच्यापाशी जन्माचे प्रमाणपत्र नसल्याच्या कारणावरून गिनिज बुकने त्यांच्या या विक्रमांची नोंद केली नाही. फौजा आपली जन्मतारीख १ एप्रिल १९११ अशी सांगत. त्यांच्या ब्रिटीश पासपोर्टवरही तीच तारीख होती. पण गिनिज बुकच्या नियमांमुळे ती मान्य होऊ शकली नाही. अर्थात त्यामुळे फौजा यांना काहीच फरक पडला नाही. कारण, पहिल्याच मॅरेथॉनने ते एकदम प्रसिध्दीच्या झोतात आले. आदिदास या बुटांच्या जगप्रसिध्द कंपनीने त्यांना ब्रँड अम्बॅसेडर म्हणून नियुक्त केले. लंडनच्या सर्व भागातील होर्डिंगजवर त्यांची छबी झळकली व एका रात्रीत ते सर्वप्रसिध्द होऊन गेले. यानंतर जगभरातील मॅरेथॉन शर्यतींसाठी सन्माननीय खेळाडू म्हणून त्यांना निमंत्रित केले जाऊ लागले. इतर असंख्य कंपन्यांच्या जाहिराती तसेच प्रायोजित कार्यक्रमांमध्ये ते झळकू लागले. ब्रिटीश एअरवेजच्या तिकिटावर त्यांची छबी छापण्यात आली. क्वीन एलिझाबेथने खास निमंत्रण देऊन त्यांचा सत्कार केला. दोन हजार सालापासून पुढची अकरा वर्षे त्यांनी जगभरातील अकरा मॅरेथॉन स्पर्धांमध्ये भाग घेतला व नवनवे विक्रम केले. २०११ मध्ये शेवटची पूर्ण ४१ किलोमीटरची शर्यत ते लंडनमध्ये धावले. ती त्यांनी सात तास ४९ मिनिटात पूर्ण केली. त्यानंतर वयाच्या शंभरीनंतर ते दहा किलोमीटरच्या छोट्या मॅरेथॉन धावू लागले.

### समाधानी, आशावादी जीवन

मुंबईमध्ये २०१३ च्या मॅरेथॉन स्पर्धेसाठी आले होते. त्यावेळी जॉन अब्राहम व इतर बरेच तारे त्यांच्यासोबत दहा किलोमीटरचे अंतर धावत होते. पण सर्व क्रीडारसिकांचे मुख्य आकर्षण फौजा हेच होते. त्याच वर्षी हाँगकाँगमध्ये मॅरेथॉन धावल्यानंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेणे थांबवले. मात्र त्यांचा जगभरचा प्रवास व धावपटू व क्रीडापटूंना प्रेरणा देणे चालूच राहिले. फौजा यांचा जन्म १९११चा. त्याच वर्षी ब्रिटिशांनी आपली राजधानी कोलकात्याहून दिल्लीला हलवली. नंतर तीन वर्षांनी पहिले महायुध्द झाले. पुढे फौजा हे जाणते असताना त्यांनी दुसरे महायुध्द, देशाची फाळणी अशा अनेक विध्वंसक घटना पाहिल्या. नंतर खलिस्तानचे आंदोलन, शिखांच्या हत्या हेही पाहिले. वैयक्तिक आयुष्यातही अनेक दुःखे सहन करावी लागली. खुद्द त्यांना वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत चालता येत नसे. त्यांचे पाय एखाद्या काठीसारखे बारीक होते. त्यावरून त्यांना चिडवलेही जाई. नंतर त्यांची प्रकृती सुधारली. काही काळ त्यांनी क्रीडापटू होण्याचे स्वप्न पाहिले. पण नंतर ते सांसारिक आयुष्यात पडले. इतके सर्वसामान्य आयुष्य जगलेला हा माणूस इतका दीर्घ आयुष्य कसे जगू शकला असे कोडे अनेकांना पडते. याचे उत्तर त्यांच्या वृत्तीत असावे. मधल्या काळात मुलाच्या मृत्यूमुळे निराश झाले असले तरी त्यांची एकूण प्रवृत्ती ही आनंदी व आशावादी राहण्याची होती. वयाच्या ९५व्या वर्षी मॅरेथॉन पूर्ण केल्यानंतर मला मस्त वाटते आहे व भरपूर जगायचे आहे असे ते वार्ताहरांना म्हणाले होते. ते पूर्णपणे शाकाहारी होते. शिवाय पंजाबी असूनही त्यांनी कधीही पराठा व इतर तेलतुपाचे पदार्थ खाल्ले नाहीत. साध्या चपात्या, भाजी व ताक हाच त्यांचा आहार राहिला. ते भातही खात नसत. आंबे मात्र त्यांना प्रचंड आवडत. अगदी शेवटच्या दिवसापर्यंत दिवसाला चार-पाच आंबे ते खात. मात्र जागेपणी ते एकतर उभे तरी असत किंवा चालत तरी असत. बसणे वा झोपून राहणे हे त्यांना मानवणारे नव्हते. मी झोपलो की संपलो असे ते म्हणत. वयाच्या ८० व्या वर्षानंतर मिळालेली कीर्ती व पैसा यामुळे त्यांच्या जगण्यात काहीही फरक पडला नाही. त्यांचा मोह त्यांना वाटला नाही. ते जातील तिथे लोक त्यांना पुरस्कार देत, भेटी देत. ते सगळे ते गरिबांना वाटून टाकत. नेसलेसारख्या कंपन्यांनी दिलेल्या अवाढव्य रकमांचे चेकही ते समाजसेवी संस्थांकडे धाडून देत. त्यांच्या या समाधानी व आशावादी वृत्तीनेच त्यांना हे दीर्घायुष्याचे लेणे बहाल केले यात शंका नाही.

## विचार

# अमेरिकेच्या अंगणातून...

***अगदी काल-परवापर्यंत आपल्या मुलांसह व्हाईट हाऊसमध्ये सुखनैव संचार करणारे इलॉन मस्क यांचे ट्रम्प महोदयांशी मतभेद झाले आणि दोघांनी एकमेकांवर आगपाखड केलेली जगाने पाहिली. आता मस्क यांनी 'अमेरिका पार्टी' या आपल्या नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली आहे. दुसरीकडे ट्रम्प यांचा टॅरिफबाबतचा नरमाईचा सूर पाहायला मिळतो आहे. या महत्त्वपूर्ण घटनांचे विवेचन करण्यासाठी हा लेखप्रपंच.***





**डॉ. भालचंद्र कानगो**

जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेतील घडामोडींकडे संपूर्ण जगाचे लक्ष असते. त्यामुळे ट्रम्प यांच्या छोट्या-मोठ्या घोषणा, टॅरिफसंदर्भातील बदलते निर्णय तसेच मस्क यांच्याशी संबंध ताणले जाणे, मस्क यांनी आपला नवा राजकीय पक्ष स्थापन करणे या आणि यासारख्या घटनांचा परामर्श अलिकडे गांभिर्याने घेतला गेला. विसाव्या शतकात अमेरिका हा जगातील सर्वात मोठा वर्चस्ववादी देश होता. या वर्चस्वाचा, आपल्या लष्करी-आर्थिक ताकदीचा वापर करुन त्यांनी संपूर्ण जगावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या साह्याने त्यांनी जगावर नवीन आर्थिक धोरण लादले. त्याचा लाभ गुगल, फेसबुक, मायक्रोसॉफ्ट यासारख्या मल्टीनॅशनल कंपन्यांना झाला. या कंपन्यानी नफा वाढवलाच, खेरीज विस्तारही केला. युरोपच्या साह्याने अमेरिकेने इतर देशांमध्ये गुंतवणूक करुन इतर देशांमध्येही आपला नफा कायम राहण्याची व्यवस्था केली. पण कालांतराने चीन, भारत, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आदी देशांची ताकदही वाढू लागली. त्यामुळे आजमितीला जगात अमेरिका हीच एकमेव महाशक्ती असल्याची परिस्थिती राहिलेली नाही. स्वाभाविकच अमेरिकेतील लोकांना याचे वैषम्य वाटू लागले. विशेषत: १९८५ नंतर जगात आलेल्या नव्या आर्थिक धोरणानंतर जगातील सर्व देशांचे एकमेकांवरील अवलंबित्व वाढले. विसाव्या शतकात आपण आपली व्यवस्था निर्माण करु शकतो, असा आत्मविश्वास अनेक देशांना होता. पण २१ व्या शतकात तो डळमळीत झालेला दिसत आहे. जागतिक पातळीवर एकमेकांना मदत केल्याखेरीज आपली अर्थव्यवस्था सुधारु शकत नाही तसेच टिकूही शकत नाही, हे आता देशांच्या लक्षात आले आहे. मात्र अमेरिकन वर्चस्ववाद्यांना या वास्तवाचा स्विकार करणे कठीण होते. त्यामुळे जगावर आपले वर्चस्व कायम राखण्याकडे त्यांचा ओढा होता. तशी रचना शोधण्याच्या प्रयत्नातूनच ट्रम्प यांचा उदय झाला आहे.

जागतिकीकरणामध्ये पुढारलेल्या देशांची लोकसंख्या घटू लागली वा स्थिर झाली. त्यामुळे बाहेरच्या देशांमधून त्यांच्याकडे येणारी श्रमशक्ती वाढली. यातूनच अशा देशांमध्ये निर्वासित, स्थलांतरितांचा प्रश्न निर्माण होऊन हळूहळू गंभीर बनला. ही बाब एवढ्यापुरतीच सीमित राहिली नाही. पैसे कमावू इच्छिणाऱ्या मोठ्या विद्यापीठांनीही यासाठी बाहेरचे विद्यार्थी घेण्यास प्राधान्य दिले. बाहेरचे विद्यार्थीही उपलब्ध संधी लक्षात घेऊन मोठ्या संख्येने येऊ लागले आणि आणखी एका प्रश्नाने जन्म घेतला. म्हणूनच आपले पूर्वीचे स्थान मिळवण्यासाठी, इतर देशांच्या प्रगतीवर अंकुश ठेवून पुन्हा प्रथम क्रमांकाचा देश ठरण्यासाठी अमेरिकेने ट्रम्प या प्रवृत्तीला जन्माला घातले. मात्र कोणत्याही एका देशाने जगाला नियंत्रित करण्याची बाब नवीन तंत्रज्ञानाच्या विश्वात अशक्य असल्याचे ते विसरले. अमेरिकेचे हे स्वप्न स्वप्नच राहणार असून कधीच सत्यात उतरु शकणार नाही. आता बाकीचे जग त्यांच्या दादागिरीला घाबरणार नाही.

दुसरीकडे अमेरिकेत रिपब्लिकन पक्ष इतका मजबूत झाला आहे की विरोधी डेमोक्रॅटिक पक्ष त्याला विरोध करु शकेल की नाही, हा प्रश्न निर्माण झाला आहे. हे हेरुन मस्क यांनी वेगळा पक्ष काढून आपली भूमिका लोकांसमोर नेण्याचा प्रयत्न केला आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य करुन पुढे जायचे की दादागिरी करुन पुढे जायचे हे त्यांच्यामधील वाद असून नवी पक्ष निर्माण करुन आता मस्क यांनी यात उडी घेतली आहे. मीडिया दाखवत नसला तरी आजही जगातील विविध देशांमध्ये ७०० पेक्षा अधिक तळ असणारा देश म्हणजे अमेरिका. अन्य कोणत्याही देशाचे इतके परदेशी तळ नाहीत. अलिकडेच अमेरिकेने इराणवर हल्ला केला तेव्हा मध्य आशियात त्यांचे ४० हजार सैनिक असल्याचे जगासमोर आले. म्हणजे लष्करी सामर्थ्याच्या बळावर त्यांनी अशा प्रकारे जगावर वर्चस्व राखले आहे. आज तरी त्यांच्या या सामर्थ्याला पर्याय नाही. त्याचा फायदा घेत ट्रम्प एकीकडे अमेरिकेतील व्यापाराची शक्ती वापरण्याचा प्रयत्न करत आहेत तर दुसरीकडे, लष्करी शक्तीच्या आधारे दमदाटी करुन अन्य देशांना दाबात ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. असे असताना मस्क यांची अडचण होणे स्वाभाविक होते. यातूनच आता त्यांच्या नव्या पक्षाचा जन्म झाला आहे, असे म्हणता येईल.

ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिका आणि चीनचे संबंध तणावग्रस्त झाले. ही बाब मस्क यांच्या फायद्याची नाही, कारण त्यांचा संपूर्ण व्यवसाय चीनच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे. असेच होत राहिले तर आज ना उद्या चीन आपल्याला त्रास देईल, हे लक्षात घेऊन त्यांनी ट्रम्प यांच्यापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी व्हाईट हाऊसपासून फारकत घेतली. पण यानंतरही ट्रम्प थांबले तर ठीक, अन्यथा वेगळा मार्ग अवलंबण्याची दृष्टी नवा राजकीय पक्ष स्थापण्यामागे आहे. याखेरीज ट्रम्प यांच्या दृष्टीने बघायचे तर अमेरिकन अर्थव्यवस्था आता बऱ्याच अंशी चीनवर अवलंबून आहे. त्यामुळेच चीनवर भरभक्कम आयात कर लावला आणि प्रत्युत्तरादाखल चीननेही अमेरिकेवर त्या प्रमाणात आयात कर लादला तर अमेरिका अडचणीत येण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच आयात करात वाढ करण्यासंदर्भात सतत मुदतवाढ देत राहण्याखेरीज ट्रम्प यांच्याकडे कोणताही पर्याय राहिल्याचे दिसत नाही. ते छोट्या छोट्या देशांवर दादागिरी करु शकतील. त्यांची अर्थव्यवस्था आपल्या ताब्यात असल्याच्या भ्रमात राहून ते अगदी भारतासारख्या देशावरही दादागिरी करु शकतील. पण चीन आणि रशियासारख्या देशांवर त्यांच्या दादागिरीचा काहीही परिणाम होणार नाही. रशियावर निर्बंध लादूनदेखील हा देश युद्धाबाबत त्यांचे काही ऐकत नसल्याची बाब हेच सिद्ध करते. युरोपनेही हळूहळू आपली वाट वेगळी करायला सुरूवात केली आहे. म्हणूनच आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी अमेरिकेला आता कोणती रचना करावी, याविषयी पुन्हा एकदा चर्चा करावी लागणार आहे.

थोडक्यात, अमेरिकेचे वर्चस्व कमी झालेले नाही, तर त्यांच्या तोडीस तोड चीन, रशिया, भारत, ब्राझिल असे इतर देशही विकसित होऊ लागले आहेत. खरे तर इतर देशांचा विकास हेच २१ व्या शतकाचे वैशिष्ट्य आहे. अमेरिकेला हे वास्तव स्विकारणे जड जात आहे. ट्रम्प यांच्यासारख्या लोकांना उभे करण्यामागे हाच विचार होता. पण आता त्यांनाही देशांतर्गत विरोधाला सामोरे जावे लागत आहे. त्यातही परीक्षा म्हणजे त्यांच्याकडे नोव्हेंबर महिन्यामध्ये सिनेटच्या निवडणुका होणार आहेत. सध्या सिनेट आणि कॉंग्रेसमध्ये रिपब्लिकन पक्षाचे बहुमत आहे. त्यामुळे ट्रम्प यांची दादागिरी खपून जात आहे. पण या निवडणुकीमध्ये एका सभागृहातही त्यांच्या पक्षाचा पराभव झाल्यास बिले संमत करणे कठीण जाईल. अशा प्रकारे अडचणी निर्माण करण्याचाच विरोधकांचा प्रयत्न आहे. मात्र मस्क यांच्या नव्या पक्षामुळे यात अडचणी निर्माण होऊ शकतात. अर्थात या नव्या पक्षाचा फटका ट्रम्प यांना बसेल की डेमोक्रॅट्सना, यावर अमेरिकेचे भवितव्य अवलंबून आहे. आपल्याला मानणारे अनेक लोक असल्यामुळेच आपण सत्तेत आलो आहोत, असे ट्रम्प यांना वाटते. पण मस्क यांनी स्वतंत्र पक्षाद्वारे वेगळी भूमिका घेतली तर निश्चितच अडचणीत सापडतील. म्हणूनच अमेरिकेसाठी नोव्हेंबरच्या या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यातही सिनेटमध्ये ट्रम्प यांच्या पक्षाकडे खूप कमी फरकाचे बहुमत असल्यामुळे काटें की टक्कर राहणार, यात शंका नाही. त्यामुळेच इलॉन मस्क यांनी नव्या पक्षाची स्थापना करुन ट्रम्प यांना आव्हान देण्याचे ठरवले आहे. खरे तर इलॉन मस्क यांना ट्रम्प यांचा मोठा साथीदार, पाठिंबा देणारा म्हणत मीडियानेच डोक्यावर घेतले होते.

परंतु, नंतर अमेरिकेतील लोकांनीच मस्क यांच्या टेस्ला कारवर बहिष्कार घालण्याची मागणी करत चळवळ उभी केली. म्हणजेच तिथे मस्क यांना विरोध करणारा एक गट आहेच. तो किती मजबूत आहे, याविषयी इथे बसून फार काही बोलता येणार नाही. पण डोनाल्ड ट्रम्प ज्या पद्धतीने मस्क यांच्यावर तुटून पडले आहेत, ते बघता त्यांना मस्क यांच्या ताकदीची कल्पना आहे, याबाबत शंका नाही. शेवटी पैशाची ताकद मोठी असतेच. तो निवडणुकीत ट्रम्प यांच्या विरोधात वापरला गेल्यास ते नक्कीच अडचणीत येऊ शकतात. हे सगळे लक्षात घेता येत्या दोन-तीन महिन्यांमध्ये ट्रम्प आणि मस्क यांच्यातील भांडण अधिक उग्र होईल, असा अंदाज आहे. त्यानंतर कोण हरते आणि कोण जिंकते यावर परिस्थिती कशी कलाटणी घेईल हे ठरेल.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

## चर्चा आजची

# जगाने दखल घेतली, महाराष्ट्र सरकार कधी घेणार?

**संतोष राऊळ**

नुकतेच युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह देशासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत पुरातत्व आणि संग्रहालय संचालनालयाने या मान्यतेसाठी प्रस्ताव तयार केल्याने महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूमधील एका किल्ल्याला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. या किल्ल्यांच्या यादीत रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी यांचा समावेश आहे. त्यामुळे शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. परंतु, महाराजांच्या किल्ल्यांची दखल जगाने दखल घेतली, महाराष्ट्र सरकार कधी घेणार? असा सवालही त्यांच्यातून उपस्थित होत आहे.

युनेस्कोने अधिकृतपणे भारतातील मराठा लष्करी भूदृश्ये त्यांच्या प्रतिष्ठित जागतिक वारसा यादीत समाविष्ट केली आहेत. हा टप्पा केवळ किल्ल्यांचाच नाही तर रणनीती, सामर्थ्य आणि सार्वभौमत्वाचा एक महान वारसा साजरा करतो. यामध्ये १७ व्या आणि १९ व्या शतकादरम्यान मराठ्यांनी बांधलेल्या १२ किल्ल्यांचा संग्रह समाविष्ट आहे. एकत्रितपणे, ते मराठा साम्राज्याची व्याख्या करणारे विशाल प्रादेशिक विस्तार, स्थापत्य तेज आणि धोरणात्मक प्रभुत्व दर्शवितात. महाराजांच्या या १२ किल्ल्यांच्या समावेशासह, भारतातील युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांची एकूण संख्या आता ४४ झाली आहे. १७व्या शतकातील मराठ्यांचे किल्ले केवळ लष्करी किल्ले नव्हते. ते प्रशासन, संरक्षण आणि कल्पकतेचे गतिमान केंद्र म्हणून काम करत होते. उपखंडातील विविध भूदृश्ये, जसे की किनारपट्टी, टेकड्या, बेटे किंवा घनदाट जंगले यांच्याशी अखंडपणे मिसळण्यासाठी बांधलेले होते. प्रत्येक किल्ला मराठा अनुकूलता,



लवचिकता आणि दूरदृष्टीचा पुरावा होता.

खरंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून ते इंग्रजांचे राज्य येईपर्यंतचे मराठ्यांनी बांधलेले व जिंकलेले अगणित किल्ले आहेत. अगदीच तंजावरपासून ते अटकपर्यंत मराठ्यांचे साम्राज्य पसरले होते. यातील सर्वच किल्ले एकमेकांपासून वेगळे आहेत. प्रत्येक किल्ल्याचं महत्व वेगळं आहे. त्यामुळे प्रत्येक किल्ल्याचा अभ्यास जर युनेस्कोने केला असता तर त्यांना कोणकोणत्या किल्ल्याची निवड करावी, हा प्रश्न नक्कीच पडला असता. असे हे एकापेक्षा एक किल्ले आहेत. परंतु, महाराष्ट्राचा दुर्दैव असं की, या किल्ल्यांकडे महाराष्ट्र सरकारसह पुरातत्व खात्याचे देखील अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे शिवभक्तांमधून बोलले जात आहे. जेव्हा अशा ऐतिहासिक वास्तूंची जागतीक वारसा यादीत नोंद होते तेव्हा संबंधित ठिकाणचा कायापालट होतो. त्या वास्तूंचा इतिहास जगभर पसरतो. पर्यटन वाढून स्थानिकांना रोजगारांची संधी उपलब्ध होते. तसेच, वास्तूचे जतन देखील केले जाते. परंतु, आता ज्या १२ किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत झाला आहे, त्यांचा कायापालट होण्यासाठी अजून किती वर्ष लागणार, हा प्रश्न देखील शिवभक्तांना पडला आहे. कारण या आधिपासूनच महाराजांचा मुख्य किल्ला असलेल्या दुर्गराज रायगडाची गेली कित्येक वर्षे डागडुजी केली जात आहे. रोज नव्याने काहीतरी त्या ठिकाणी सापडत असतं. स्थानिक दुर्ग संवर्धक वर्षानुवर्षे तहानभूक हरवून किल्ल्यांच्या संवर्धनासाठी झटत असतात. मात्र, त्यांना देखील काही मर्यादा असतात. त्यांना जर सरकारची जोड मिळाली तर महाराष्ट्रातील सर्वच किल्ले प्रकाश झोतात येतील, अशीही चर्चा शिवभक्त आणि दुर्ग संवर्धकांमधून होत आहेत.

आता ज्या १२ किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत झाला आहे त्यांचा काही वर्षात कायापालट होणे अपेक्षीत आहे किंवा होईल ही. मात्र, उर्वरित किल्ल्यांचं काय? महाराष्ट्राला ज्ञात असलेले असे साधारण साडेतीनशे किल्ले आहेत.

त्यापैकी फक्त १२ किल्ल्यांचा समावेश युनेस्कोने केला आहे. शिवभक्तांनी आनंदोस्तव देखील साजरा केला; परंतु, त्यांनी उर्वरित किल्ल्यांचा देखील जागतिक वारसा यादीत नोंद व्हावी, यासाठी अट्टाहास धरणे गरजेचे असल्याचे जनसामान्यांतून बोलले जात आहे. निदान उर्वरित किल्ल्यांची शासनाने तरी दखल घ्यावी आणि त्यांच्या संवर्धनासाठी सर्वोतपरी प्रयत्न करावेत. परंतु, तसे होताना दिसत नाही. लोकनेते देखील याकडे दुर्लक्ष करीत आहेत. जे संवर्धनासाठी झटत आहेत त्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. पुरातत्व खात्याच्या नियम व अटींमुळे खुप जास्त मर्यादा त्यांच्यावर येतात. त्यामुळे इच्छा असून देखील हाती घेतलेले काम पुर्णत्वास जात नाही. त्यामुळे जगाने काही प्रमाणात का होईना दखल घेतील, महाराष्ट्र सरकार कधी घेणार, असा प्रश्न महाराष्ट्राच्या जनतेला पडला आहे.

## लोकसंसद

### समोसा, जिलेबीसाठी 'आरोग्याला धोकादायक' इशारा नाही

समोसा, वडापाव, जिलेबी, लाडू आणि मिठाई यांसारख्या अन्नपदार्थांवर उत्पादकांनी, विक्रेत्यांनी सिगारेटच्या पाकिटावर लिहिल्याप्रमाणे हे पदार्थ 'आरोग्यासाठी हानिकारक आहेत' असे आरोग्यविषयक इशाऱ्याचे वाक्य लिहावे असा आदेश केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिल्याची बातमी प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध झाल्यानंतर एकच गहजब उडाला. अनेकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला. विविध वृत्तवाहिन्यांवर लागलीच आहारतज्ञ, हॉटेल मालक, समाजसेवक इत्यादींना बोलावून या विषयावर चर्चासत्रही झडली. त्यातून सरकारच्या या निर्णयाच्या अनुषंगाने संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. अन्नपदार्थांना तंबाखू आणि सिगारेटच्या रांगेत बसवणे हे अनेकांना खटकले. सिगारेटच्या पाकिटावर 'सिगारेट ओढणे आरोग्यासाठी हानिकारक' असल्याचा इशारा दिलेला असताना त्याकडे दुर्लक्ष करून सिगारेट ओढणारे महाभाग असतातच, तद्वत जिभेचे चोचले पुरवणारे वडापाव, समोसा, जिलेबी असे आपले आवडते पदार्थ 'आरोग्यास अपायकारक' आहेत असे कितीही म्हटले तरी खाणारे ते पदार्थ खाण्याचे सोडणार नाहीत, असाही एक मतप्रवाह समोर आला. ही चर्चा टिपेला पोहोचली असतानाच भारतीय प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने (पीआयबी) या बातमीचे खंडन केले असून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सिगारेटसारखा समोसा, जिलेबी आणि तत्सम अन्नपदार्थांसाठी असा कोणताही 'आरोग्य हानिकारक' इशारा दिला नसल्याचे म्हटले आहे. पीआयबीच्या खुलाशाने लोकांच्या मनातील संभ्रम दूर झाला आहे.



**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# मुंबई ते रेवस एक अधुरा प्रवास

१७ जुलै १९४७ या दिवशी एस. एस. रामदास ही बोट रेवसजवळच्या काशाच्या खडकाजवळ उलटली. तीन डेक असलेली ४०६ टन वजनाची एस. एस. रामदास हि बोट १९३६ साली बांधलेली होती. एकावेळी सुमारे १२०० प्रवासी वाहून नेण्याची या बोटीची क्षमता होती. अनेकदा वादळवाऱ्यात सापडून आणि मोठमोठ्या लाटांशी सामना करुनही या बोटीला कधीही कोणताही अपघात झालेला नव्हता. सिंदीया स्टीमशीप कंपनीच्या सगळ्या बोटींपैकी रामदास ही सर्वात भक्कम आणि सुरक्षीत बोट आहे अशी कोकणात जाणाऱ्या नेहमीच्या प्रवाशांचा ठाम विश्वास होता, त्यामुळे या बोटीवर कायमच प्रवाशांची गर्दी असे.

सुमारे दोन-तीन दिवसांपासून मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर तुफान पाऊस सुरु होता. १७ जुलैच्या सकाळीही मुंबईत पावसाची संततधार सुरुच होती. अशा पावसातच रामदास बोट भाऊच्या धक्क्यावर उभी होती. सुमारे हजारेक प्रवासी बोटीवर होते. काहीजणांनी वादळाचा एकंदर रंग पाहून आपला प्रवासाचा बेत रद्द केला होता. पण रामदास बोटीवरुन नियमित कोकणप्रवास करणाऱ्यांना मात्र वादळा-पावसाची फारशी चिंता वाटत नव्हती. रामदास बोट वादळवाऱ्यातून तावूनसुलाखून निघालेली म्हणून ओळखली जात होती. बोटीवरुन नियमित प्रवास करणाऱ्यांपैकी अनेकांची शेख सुलेमानशी चांगली ओळख होती. जेमतेम दीड तासाचा रेवसपर्यंतचा प्रवास एका इंजिनावर आणि शेख सुलेमानसारख्या अनुभवी माणूस असताना करणं सहज शक्य होतं याची नेहमीच्या प्रवाशांना पक्की खात्री होती. त्यामुळे त्यांनी कॅप्टन शेख सुलेमानला लवकर निघण्याचा आणि रेवसला पोहोचल्यावर इंजिनाची दुरुस्ती करण्याचा आग्रह धरला. हो-ना करताकरता अखेर प्रवाशांच्या आग्रहाखातर शेख सुलेमानने होकार दिला आणि साडेआठच्या सुमाराला बोटीने नांगर उचलला आणि भाऊचा धक्का सोडून रेवसची वाट धरली.

काही वेळाने पावसाचा जोर जबरदस्त वाढला आणि वादळाने रुद्रावतार धारण केला! आधीच सुरु असलेल्या पावसाने आणि उंचउंच उसळणाऱ्या लाटांनी रामदास बोट कधी नाही इतकी हेलकावे खात होती. त्यातच आता भर पडली ती अमावस्येच्या उधाणाच्या भरतीची! या उधाणाच्या भरतीमुळे उसळणाऱ्या उंचच उंच लाटांच्या थपडा बोटीला बसत होत्या! रामदास बोटीवरुन नियमित प्रवास करणारे अनुभवी प्रवासी आणि खुद्द कॅप्टन शेख सुलेमान हे सुद्धा या भयानक वादळाने हादरुन गेले होते तर इतरांची काय कथा! खालच्या डेकवरचे प्रवासी धावतपळत वरच्या डेकवर आले होते कारण लाटांच्या तडाख्याने त्यांना सचैल समुद्रस्नान घडलं होतं. त्यातच एक अजस्त्र लाट काशाच्या खडकाच्या दिशेने उजव्या बाजूने बोटीवर येऊन आदळली आणि बोट उलटली! बोटीवरच्या सुमारे साडेसातशे प्रवाशांपैकी एकूण एक प्रवासी आणि शेख सुलेमानसह बोटीवरचे कर्मचारी खवळलेल्या समुद्रात फेकले गेले. अनेक माणसं काहीतरी आधाराने समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगत होती. तर कित्येक प्रेतंही आजूबाजूला विखरलेली दृष्टीस पडत होती. काहीतरी भयंकर आक्रीत घडल्याची कल्पना येताच कोळ्यांनी आपल्या गलबतांवरची सुमारे दोन हजार रुपये किमतीची मासळी समुद्रार्पण केली आणि समुद्रात तग धरुन असलेल्या माणसांना वाचवण्याचं काम हाती घेतलं. रामदास बोटीवरच्या साडेसातशे प्रवाशांपैकी सुमारे साडेसहाशे प्रवाशांचा बळी गेला होता. यापैकी कित्येक प्रवाशांचे मृतदेह नंतर रेवसपासून ते अलिबागपर्यंतच्या किनाऱ्याला लागले होते तर अनेकांचे मृतदेह सागराच्या उदरात गडप झाले!

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ जुलै

१)श्री.अशोक नारायण वर्तक सासवणे,अलिबाग, १७-०७-१९५०
२)श्रीम.सुरेखा अनंत पेडवी आगरसुरे,अलिबाग, १७-०७-१९४४
३)श्रीम.सुनंदा मधुकर तळकर रामनाथ,अलिबाग,१७-०७-१९५२
४)श्रीम.रेखा रमेश शिंपी अलिबाग, १७-०७-१९५५
५)श्रीम.अपर्णा अरविंद कोहीरकर अलिबाग, १७-०७-१९५४
६)श्री.श्रीकांत नाथोबा नाईक काविर, अलिबाग १७-०७-१९६४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**


**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**पार्थ मिथुन रोगे, वाढदिवस, नवेदर नवगाव, अलिबाग**

## सुवर्णकण



माणुसकी जिथे जन्म घेते तेथे परमेश्वराच वास्तव्य असते.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## राखीनिर्मिती कार्यशाळेचे आयोजन



**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती राधाबाई खेमचंद परमार रोटरी कर्णबधिर मुलांची विशेष निवासी शाळा नवीन पनवेल येथे इनरव्हील क्लब सदस्या मा. प्राजक्ता नेरकर यांनी विद्यार्थ्यांकडून राखी तयार करणे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होत स्वतः राखी तयार करून स्वनिर्मितीचा आनंद घेतला. याप्रसंगी ट्रस्टचे चेअरमन अरविंद सावळेकर आणि ट्रस्ट सचिव प्रमोद वालेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बंदसोडे व शाळेतील शिक्षक कर्मचारी वृंद उपस्थित होते. मोठ्या उत्साहात कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली.

# स्वच्छतागृह अद्याप नादुरुस्त

## • गैरसोय होत असल्याने पर्यटकांमध्ये नाराजी



**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान शहरात येणाऱ्या पर्यटकांकडून माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेकडून स्वच्छता कर वसूल केला जातो. त्यातून त्यांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देणे पालिकेची जबाबदारी असते. मात्र, शहरातील इको पॉईंट या महत्वाच्या प्रेक्षणीय स्थळी पर्यटकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेले स्वच्छतागृह अनेक वर्ष नादुरुस्त आहेत. दरम्यान पालिकेत प्रशासकीय राजवट असताना देखील सोयीसुविधा मिळत नसल्याने पर्यटकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांकडून माथेरान गिरीस्थान नगरपरिषद स्वच्छता कर वसूल करते. स्वच्छता कराच्या माध्यमातून शहरात स्वच्छता ठेवणे आणि प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने पालिकेवर टाकली आहे. प्रत्येक पर्यटकांकडून ५० रुपये स्वच्छता कर घेणाऱ्या पालिकेकडून पर्यटकांसाठी प्राथमिक सुविधेसाठी स्वच्छतागृह देखील नीटनेटकी नसल्याचे चित्र आहे. शहरात प्रेक्षणीय स्थळे असलेल्या ठिकाणी स्वच्छतागृह बसवली आहेत. मात्र, बहुसंख्य ठिकाणी ही स्वच्छतागृह नादुरुस्त अवस्थेत असून विशेषतः महिला पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे.

माथेरान पालिकेत प्रशासक राजवट गेली अडीच वर्षापासून असूनदेखील पर्यटकांना सोयी सुविधा देण्यात पालिका कमी पडत आहे. त्यामुळे माथेरानमध्ये पर्यटकांची गैरसोय होताना दिसत आहे. त्या सर्व स्वच्छतागृह यांच्याबद्दल माथेरान मनसेच्यावतीने आवाज उठवला जात असून पालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करून देखील स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय आहे.

माथेरान शहरात पर्यटनासाठी येणारा पर्यटक हा बहुसंख्येने इको पॉईंट या ठिकाणी पर्यटनासाठी येत असतो. त्या ठिकाणी घोडा स्टँडच्या बाजूला पालिकेने दोन स्वच्छतागृह बसविले आहेत. महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र स्वरूपात असलेल्या त्या सर्व स्वच्छतागृहांचे दरवाजे तुटले आहेत. स्वच्छतागृहाची आजची अवस्था मागील चार महिन्यापासून कायम आहे. स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्याची साधी तसदी माथेरान नगरपरिषद घेत नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच, त्या ठिकाणी फायबर मटेरियलमध्ये तयार करण्यात आलेल्या स्वच्छतागृहांच्या बाजूला पाण्याची टाकी आहे. मात्र, स्वच्छतागृह बंद असल्याने त्या टाक्या पाण्याने भरून वाहत असतात.

### पालिकेचे दुर्लक्ष

स्वच्छतागृहांचे दरवाजे दुरुस्त करण्यास पालिकेला वेळ नसल्याने माथेरानमधील इको पॉईंट येथे येणारे पर्यटक नाराजी व्यक्त करतात. तसेच तेथे व्यवसाय करणारे स्थानिक व्यावसायिकांकडून सातत्याने त्या स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्याची मागणी देखील पालिका पूर्ण करीत नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. पालिका मुख्याधिकारी आणि प्रशासक राहुल इंगळे हे कार्यालयाच्या बाहेर जाऊन आपल्या पालिकेच्या मालमत्ताची पाहणी करीत नसल्याने शहरात सर्वत्र गैरसोयीचे वातावरण आहे.

## शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज भरण्याचे आवाहन

**रायगड :** सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व बहुजन कल्याण विभागामार्फत विजाभज, इमाव, विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता देण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता नवीन आणि नूतनीकरणासाठी अर्ज करता येणार आहे. https://mahad-btmahait.gov.in/Home/Index या लिंकच्या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरणे दि.३० जुलै २०२५ पासून सुरु होणार असून जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी, विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सुनिल जाधव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड अलिबाग, कच्छि भवन, अलिबाग येथे संपर्क साधवा.

## तळवडे पुलावरील वाहतूक धोकादायक

**| नेरळ | वार्ताहर |**



कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर तळवडे, कोल्हारे या गावांना जोडणारा पूल आहे. त्या पुलावर असलेला पृष्ठभाग हा खड्ड्यांनी व्यापला असून त्या पाण्यातून मार्ग काढताना वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलाची निर्मिती १५ वर्षापूर्वी करण्यात आली. या पुलाच्या निर्मितीमुळे उल्हास नदीच्या पलीकडे असलेल्या तळवडे, पिंपळोली, भाकरीपाडा, आंत्रट, काळेवाडी, गुडवण या भागातील रहिवाशी यांना जवळचा मार्ग निर्माण झाला आहे. तर कोल्हारे, भोपळे आणि धामोते तसेच नेरळ भागातील रहिवाशी यांना देखील तळवडे भागात जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध झाला.

मात्र, या पुलावर टाकण्यात आलेले डांबर काही वर्षात निखळले. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे या पुलाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. मागील काही वर्षात बांधकाम खात्याने पुलाचा ५० मीटर लांबीचा पृष्ठभागाचे डांबरीकरण केलेले नाही. पावसाळ्यात पुलाचा संपूर्ण पृष्ठभाग पाण्याखाली गेला असल्याने कोणत्या ठिकाणी खड्डा आहे आणि कुठे पूल खचला आहे हे दिसत नाही. त्यामुळे वाहनचालकांना धोका पत्करून वाहने चालवावी लागत आहेत.

परिणामी वाहनचालकांसाठी हा पूल धोकादायक बनला आहे. पुलाचे दोन्ही टोक हे उंच झाले असून पुढील सर्व भाग हे खोलगट झाल्याने त्या ठिकाणी साचून राहणारे पाणी पुलाखाली पडत नाही. त्यामुळे या साचलेल्या पाण्याने पुलावरून होणारी वाहतूक धोकादायक बनली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ पुलावर डांबरी पृष्ठभाग टाकण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी संदीप मसणे यांनी केली आहे.

## वावंढळ येथे आरोग्य शिबीर

**| रसायनी | वार्ताहर |**

ओम साई मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटल आणि ग्रामपंचायत वावंढळचे सुहास कदम यांच्या संयुक्त विद्यमाने वावंढळ येथे मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात स्त्रियांच्या सर्व समस्या, हृदयरोग यावर मोफत तपासणी करून औषधे देण्यात आली. यावेळी डॉ. वसंत पाटील, डॉ. टेक चंद, डॉ. मधुकर राठोड, संतोष लोभे, योगेश अनार्य, सिस्टर सुजाता खाणे, सानिका डुकरे, रक्षा डुकरे, अश्विनी मोरे यांनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी सुहास कदम, अमोल कदम, नाना पवार, यशवंत कदम, संदीप पाटील, विनोद सावंत यांनी विशेष मेहनत घेतली.

## 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत वृक्षारोपण

**| रेवदंडा | वार्ताहर |**




भारत सरकारच्या क्रीडा तथा युवा कार्यक्रम मंत्रालय संचालित माय भारत, अलिबाग-रायगड, ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा, तसेच वनपरिमंडळ, बोर्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक पेड माँ के नाम' या राष्ट्रीय पर्यावरणीय अभियानांतर्गत मांडला ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपण राबवण्यात आले होते.

या उपक्रमाअंतर्गत १२७ रोपांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी अमित पुंडे, प्रतीक कोळी, दर्श नागोटकर, ऋतिक नागोटकर, प्रफुल्ल पालवणकर, अजगर दळवी, अमोल मोहिते, पृथ्वीराज चव्हाण, परिणिती शिंदे, सुचित जावरे, वेदांती महाडिक, आर्यन गायकवाड, सार्थक नागावकर, अर्णव महानकर, भाविक पालकर, मानव रोहेकर, प्रियांश नागोटकर, राज घरत, स्वयंसेवक, स्थानिक ग्रामस्थ यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता.

## स्थानिक तरुणांसाठी मार्गदर्शन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त इंटिग्रेटेड सेवा कंपनी BVG इंडिया लिमिटेड व लोकनेते दि. बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण शिबिराचे आयोजन उलवे येथील भूमिपुत्र भवन येथे करण्यात आले होते. या शिबिरात ए. व्ही. पी. सुरज महाजन यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्राचे प्रशिक्षण व्यवस्थापक सुदर्शन भालेराव यांनी व्यवस्थापन केले होते.

यावेळी विपिन टिक्कू, संग्राम इंगवले, प्रसाद कदम, संदीप देशपांडे यांनीही तरुणांना नोकरी विषयक प्रशिक्षणाचे मार्गदर्शन केले. तर संवाद कौशल्य, इंटरव्यू तयारी, वर्तन व शिस्त आणि प्रत्येक क्षेत्रानुसार तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी उपस्थित युवक युवतींच्या नावाची नोंदणी व त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण दरम्यान सुदर्शन भालेराव यांनी नवी मुंबई विमानतळावरील संधी व त्या संधीसाठी लागणाऱ्या आवश्यक कौशल्याबद्दल विस्तृत माहिती देण्यात आली.

## कर्जतमध्ये शिक्षकांना प्रशिक्षण

**| नेरळ | प्रतिनिधी |**



कर्जत पंचायत समिती कर्जत शिक्षण विभागाच्या वतीने शिष्यवृत्ती परीक्षेचा टप्पा वाढविण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांच्या संकल्पनेतून गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन नेरळ विद्यामंदिर नेरळ शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

तालुक्यातील २०० हून अधिक शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षण विभागाने जिल्ह्यात पहिल्यांदाच आगळेवेगळे असे शिबीर शिक्षक वर्गासाठी आयोजित करण्यात आले होते. तज्ञ मार्गदर्शक म्हणून सुनील परटोले शहापूर, सुनील बैकर यांनी शिष्यवृत्ती परिक्षेचे वेळेचे नियोजन, तसेच विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्याचे उपाय, तसेच सराव परीक्षांचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.

या शिबिरास प्रमोद विचवे, कांताराम भांडे तसेच सर्व बीट विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, साधनव्यक्ती शिक्षण विभाग पंचायत समिती कर्जत आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मच्छिमार सोसायट्यांचा सन्मान

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संघ लिमिटेड रायगड संस्थाने सन २०२४-२५ या वर्षात मत्स्यव्यवसायात उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांना राष्ट्रीय मत्स्यशेतकरी दिनानिमित्त राष्ट्रीय मात्सिकी विकास बोर्ड हैद्राबादत मत्स्यव्यवसाय विभागातर्फे गौरविण्यात आले.

यावेळी खा. नितीन पाटील, डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार भा.प्र.से, जितेंद्र डूडी भा.प्र.से, आयुक्त किशोर तावडे, रायगड जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद पाटील, उपाध्यक्ष मनोहर बैले उपाध्यक्ष, धनंजय देशमुख, राजेंद्र गावडे आदिंसह मान्यवर उपस्थित होते.



## उतेखोल शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप



**| माणगाव | वार्ताहर |**

माणगाव नगरपंचायतीचे अजित तार्लेकर यांच्यातर्फे शनिवारी (दि. १२) माणगाव नगरपंचायत हद्दीतील राजिप शाळा उतेखोल या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले.

तार्लेकर यांच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमास शंकर शिंदे, अजित तार्लेकर, मयुरा तार्लेकर, अजिंक्येश जाधव, इब्राहीम करेल, अभिजित घोणे, ऋषी मोरे, अथर्व हाटे, दिनेश पोवार, सायली अंबुर्ले, अस्मिता खडतर, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिक संघात वालेकर यांची निवड

**कोर्लई :** रायगड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाच्या समन्वय समितीवर बळवंत वालेकर यांची कार्यकारिणी सदस्य निवड करण्यात आली आहे. त्यांची निवड झाल्याचे पत्र जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश पालकर गोरेगाव, माणगाव यांनी दिले आहे. वालेकर अलिबाग तालुक्यातील कामार्ले विभाग वाघोली येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे संस्थापक, विद्यमान सल्लागार आहेत.



## भगवान गौतम बुध्दांच्या पुतळ्याचे अनावरण

**| नवी मुंबई | वार्ताहर |**



नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नेरूळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई या ठिकाणी तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ महाराष्ट्र राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते, बेलापूर विधानसभा सदस्य आ. मंदाताई म्हात्रे, आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शिरीष आरदवाड, अरविंद शिंदे, सुधाकर सोनवणे, जयवंत सुतार, अनिल कौशिक, डॉ. राजेश पाटील, रविंद्र सावंत, शशिकला जाधव तसेच इतर माजी पदाधिकारी, माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुतळा स्थापन करण्यासाठी योगदान देणारे शहर अभियंता शिरीष आरदवाड, कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, उपअभियंता पंढरीनाथ चौडे, कनिष्ठ अभियंता सुनील कोकाटे, पुतळ्याचे शिल्पकार प्रदीप शिंदे तसेच संबंधित व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात आला.

## अप्रेंटिसशिप ड्राईव्हचे आयोजन

**| उरण | वार्ताहर |**

गोदरेज अ‍ॅण्ड बॉईस मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, खालापूर आणि सीनियर अप्रेंटिसशिप अ‍ॅडव्हायझर पनवेल व प्राचार्य उरण मा.वे. पिल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी अप्रेंटिसशिप ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते.

या विशेष उपक्रमामध्ये रायगड जिल्ह्यातील विविध औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून सुमारे २२५ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग नोंदवला. इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, टर्नर, मशीनिस्ट, डिझेल मेकॅनिक आदी ट्रेड्समधील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेतला. लेखी चाचणीद्वारे होतकरू प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आली असून, पात्र उमेदवारांसाठी गोदरेज कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारीची संधी खुली करण्यात आली आहे.

ड्राईव्हदरम्यान कंपनीचे मॅनेजर विशाल भावजेकर व हेड तानाजी चव्हाण यांच्याबरोबर मा.वे. पिल्ले यांनी विशेष चर्चा केली. या चर्चेत रायगड जिल्ह्यातील ट्रेड अपग्रेडेशन तसेच प्रशिक्षणार्थ्यांना भविष्यात गोदरेज कंपनीमध्ये स्थायीक रोजगाराच्या संधी मिळवून देण्यासंदर्भातील सकारात्मक चर्चा झाली.

प्रशिक्षणार्थ्यांमध्ये या उपक्रमामुळे नवचैतन्य आणि आत्मविश्वास निर्माण झाला असून, जिल्ह्यातील युवकांना उद्योगक्षेत्रात सक्षमपणे उतरण्यासाठी अशा संधी उपयुक्त ठरणार आहेत, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### शेतकरी शेतीच्या कामात मग्न | अनेक ठिकाणी पेरणी वाया

# खालापुरात भातशेती लागवडीस प्रारंभ

**| खोपोली | प्रतिनिधी |**

**यंदा पावसाने दमदार सुरुवात केल्याने भाताची शेती करणाऱ्या शेतकरी भात पीक उगवण्यासाठी जमिनीतील वाफसा मिळालाच नाही, त्यामुळे भाताचे रोप तयार होण्यात अडचणी निमार्ण झाली होती, अशा सर्व संकटावर मात करीत शेतकऱ्याने भाताची रोपे जागवण्यासाठी प्रयत्न केले.**



आता भातशेती लागवडीच्या कामांना वेग घेतल्याने कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर असून शेतकरी वर्ग सुखावला आहे. तर काही ठिकाणी शेतकरी संकटात सापडल्याने त्यांची भात शेतीचे नुकसान झाल्याचे दिसत आहे.

तालुक्यात मोठ्या प्रमाणात भातशेती लागवडीखाली येत असून शेतकरी विविध जातीची बियाणे पेरून अधिकाधिक उत्पादन घेण्याचा प्रयत्न करीत आहे. या वर्षीही बहुतांशी शेतकऱ्यांनी शेती लागवडीखाली आणण्यासाठी भात पेरणी केली खरी, परंतु या वर्षातील पावसाचे शेतकरी वर्गाची सर्व समीकरणे बिघडवली होती.

सतत पडणाऱ्या पावसामुळे भातशेती संकटात आली होती. मे महिन्यापासून पडणाऱ्या अवकाळीमुळे जमिनीला वाफसा मिळालाच नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना या वर्षात शेती करताना वेगवेगळे अडथळे निर्माण झाले. सतत पडणाऱ्या पावसामुळे पेरणी केलेली भात बियाणे अनेक ठिकाणी कुजून गेल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला असतानाही आपली पारंपारिक भात शेती टिकावी यासाठी शेतकऱ्यांनी मेहनत घेत आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकरी आपली कामे करण्यात मग्न असताना दिसत आहेत.

> **संततधार पावसामुळे अनेक ठिकाणी पेरणी केलेले भात बियाणे कुजून गेली असताना बहुसंख्य शेतकऱ्यांनी आपली पारंपारिक भात शेती टिकवण्यासाठी मोठे प्रयत्न केले असताना थोड्या प्रमाणात शेतकऱ्यांना यश आले असून काही ठिकाणी भात लागवड शेतीच्या कामांनी वेग घेतला आहे. तर शेतकऱ्यांनी मोठ्या संकटावर मात करत टिकवलेली भात शेती बहरावी यासाठी वरूण राजाने यापुढील काळात कृपादृष्टी शेतकऱ्यांवर ठेवावी.**
>
> **-अ‍ॅड.जयेश तावडे, प्रगतशील शेतकरी**

# श्रीवर्धनची ख्याती पुसण्याच्या मार्गावर

## पर्यटन व्यवसायात वाढ; मात्र शेती, नारळी पोफळीच्या बागांचे प्रमाण घटले

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**श्रीवर्धनला पर्यटनाच्या दृष्टीने महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटन वाढीला चालना देण्यासाठी वेगवेगळ्या सोयी सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पर्यटन व्यवसायात कष्ट कमी व झटपट पैसा मिळतो. हा गैरसमज अनेक बागायतदारांना निर्माण झाला आहे. त्यामुळे नारळी पोफळीच्या बागांचा तालुका म्हणून श्रीवर्धनची ख्याती पुसण्याच्या मार्गावर आहे.**



श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची जन्मभूमी श्रीवर्धन तसेच येथील प्राचीन मंदिरे, तीन किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा आणि निसर्ग सौंदर्य या कारणास्तव श्रीवर्धन एक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर नारळ, सुपारीच्या वाड्या आणि भातशेती हे ही पर्यटकांसाठी एक आकर्षण आहे. तसेच, समुद्रकिनाऱ्यावरील अद्ययावत सुशोभिकरण झाल्यावर श्रीवर्धन येथील पर्यटन वाढीला लागले व श्रीवर्धनला पर्यटन क्षेत्रात 'ब' दर्जा प्राप्त झाला. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये श्रीवर्धन येथील किमान २० टक्के बागायतदारांनी एकरोवारी वाडीतील माड, पोफळी व केळीची झाडे तोडून त्या ठिकाणी पर्यटकांच्या सोयी सुविधांसाठी वातानुकूलित व साध्या खोल्या तसेच मनोरंजनाकरीता स्वतंत्र खोलीत खेळाचे साहित्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे अनेक बेरोजगार तरूणांच्या हाताला पर्यटन व्यवसायामुळे काम मिळाले. तसेच, काही हॉटेल व्यवसायिक कोकणातील खाद्यपदार्थांच्या ऑर्डर महिला बचत गटांना देत असल्याने श्रीवर्धन येथील महिला बचत गट ही ऊर्जीतावस्थेत आले. पर्यटन व्यवसायातून अनेकांना आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत प्राप्त झाले आहे. परंतु, त्यामुळे श्रीवर्धनची नारळी पोफळीच्या बांगांची असलेली ख्याती पुसत चालली आहे.

तसेच, भातशेती बाबतीत ही श्रीवर्धन मधील शेतकरी उदासीन दिसत आहेत. शेतकऱ्याच्या घरातील तरूण वर्गाने भातशेतीकडे फिरवलेली पाठ, मनुष्यबळाचा अभाव त्यातच जिद्दीने भातशेती केलीच तर बाजारात भाताला मिळणारा अल्प भाव ही कारणे उदासीनतेला कारणीभुत ठरत आहेत. या कारणास्तव शेतकऱ्यांनी आपली शेती विकणे व पैसा मोकळा करणे हा पर्याय समोर ठेवला आहे. मुंबई-पुणे येथील उद्योजक श्रीवर्धन येथे तारांकित हॉटेल्स उभारण्यासाठी जागेच्या शोधात असल्याची कुणकुण लागताच शेतकऱ्यांनी आपली शेती योग्य भावात उद्योजकाला विकण्याचा निर्णय घेत आहेत. त्यामुळे भाताचे कोठार अशी ख्याती असलेल्या श्रीवर्धन येथे भातपीक उत्पादनात घट होऊ लागली आहे.

त्याचबरोबर नारळ, सुपारी या फळझाडांमधून चांगले वार्षिक आर्थिक उत्पन्न मिळत असतांनाही वर्षात जितके कमवत नाही तेवढे महिन्यात कमवतो या मानसिकतेने येथील बागायतदार वाड्यांमधील बाजती झाडं तोडून पर्यटन व्यवसायाला प्राधान्य देऊ लागले आहेत. काही कालावधी नंतर नारळी, पोफळींचे गाव अशी ख्याती असणाऱ्या श्रीवर्धनची ओळख रेस्टॉरंट व रिसॉर्टचे गाव, अशी होणार आहे. त्यामुळे येथील शेतकरी व बागायतदारांना याबाबत योग्य ते मार्गदर्शन होण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

---

## कोल्हाण शाळेत हस्ताक्षर कार्यशाळा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील तळाशेत केंद्रातील उपक्रमशील जिल्हा परिषदेच्या कोल्हाण येथील शाळेत सोमवारी (दि.१४) हस्ताक्षर व सुलेखन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेला मार्गदर्शन सुलेखनकार चंदन तोडणकर यांनी केले. यावेळी शाळेतील आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हस्ताक्षर व सुलेखन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना तोडणकर यांनी, दोन्ही हातांनी लेखन, उजवीकडून डावीकडे लिहिण्याची कला, तसेच बाटलीतील कलाकुसर यासारख्या विविध तंत्रांची माहिती दिली. या कार्यशाळेला शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षण तज्ज्ञ विनायक वाढवळ हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी नियोजन शाळेचे शिक्षक कुंडे व शाळा व्यवस्थापन समितीने केले. कार्यक्रमाचे सुरेख आणि ओघवते सूत्रसंचालन अशोक आव्हाड यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये हस्ताक्षर आणि सुलेखनाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला असून अशा कार्यशाळा वारंवार घडाव्यात, अशी विद्यार्थ्यांची आणि पालकांची भावना होती.

## खारगांवात झाडांचे वाटप

**श्रीवर्धन** : तालुक्यातील खारगांव ग्रुप ग्रामपंचायत मार्फत बुधवारी (दि.१६) उपक्रम २०२५-२६ अंतर्गत नागरिकांना कोकमाची झाडे वाटप करण्यात आली आहे. तसेच, वृक्षारोपण देखील करण्यात आले आहे. यावेळी अमोल पुसाळकर यांनी कोकम झाडाचे फायदे उपस्थित नागरिकांना पटवून दिले. या कार्यक्रमासाठी खारगाव ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी स्नेहल वांगेकर, अरमान राऊत, कृषी सहाय्यक अमोल गाडगे, सर्व सदस्य, शिक्षक वर्ग, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, नागरिक व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदर्श शेतकरी पुरस्काराचे आयोजन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

रायगड प्रेस क्लबकडून जिल्ह्यातील शेतीनिष्ठ व प्रगत शेतकऱ्यांना आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. याचाच एक भाग म्हणून रायगड प्रेस क्लबशी संलग्न असलेल्या नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असो.तर्फे शुक्रवारी (दि.१८) बाळसई येथील प्रगत शेतकरी मधुकर ठमके व शेतपळस येथील महादेव डाकी यांना आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम पळस येथील शिवरामभाऊ शिंदे यांच्या प्रांगणात रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. यावेळी रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, रोहा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शुभदा पाटील, सचिन कुलकर्णी, महादेव करे, रणजित लवटे, नरेंद्र जैन, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, डॉ. राजेंद्र धात्रक, सुप्रिया महाडिक, सुप्रिया डाकी, विलास चौलकर, डॉ. मिलिंद धात्रक, चंद्रकांत भालेकर, अनिल डाकी, हिराजी शिंदे, मारुती शिर्के आदींसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर, आदर्श शेतकरी पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी शामकांत नेरपगार व अध्यक्ष ॲड. महेश पवार, अनिल पवार, किशोर कदम, राजेंद्र जोशी, विनोद भोईर, दिनेश ठमके, सुनिल कोकळे, चेतन टके, सचिन नेरपगार, राजेश पिंपळे, मंजुळा म्हात्रे, वर्षा सहस्त्रबुद्धे आदी विशेष मेहनत घेत आहेत.

---

## चौक येथे पोलिसांचे संचलन



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

आगामी काळात होणाऱ्या सण उत्सवात कायदा सुव्यवस्था व्यवस्थित रहावी, तसेच सलोख्याचे वातावरण रहावे या अनुषंगाने खालापूर पोलीस ठाण्याच्यावतीने चौक फाटा येथे सोमवारी (दि.१४) पोलीस संचलन करण्यात आले होते. या संचलनाचे आयोजन खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार व राखीव पोलीस निरीक्षक विजय बाविस्कर यांनी केले होते. या संचलनामध्ये राईट कंट्रोल फोर्स प्रशिक्षक ३, मुख्यालयातील अंमलदार ७२, आरसीपी वडखळमधील ३५ जवान व खालापूर पोलीस ठाण्यातील ३ अधिकारी उपस्थित होते. संचलन चौक फाटा ते तारापूर चौक या मार्गावर संपन्न झाला.

## उरणच्या ग्रामीण भागाला कंटेनरचा विळखा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील ग्रामीण भागात येणाऱ्या दिघोडे, वेश्वी, जांभूळपाडा, खोपटा, कोप्रोली या गावातील मार्गावर दररोज कंटेनर वाहनांच्या रांगाच रांगा लागतात. याकडे संबंधित वाहतूक प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. परिणामी येथील प्रवासी नागरिकांना वाहतूक कोंडीचा व अपघाताचा सामना करावा लागत आहे. या मार्गावर दूचाकी स्वारांचे मोठ्या प्रमाणावर अपघात झाले असल्याची माहिती या मार्गावरील



नियमित प्रवासी अस्मित ठाकूर, संकेत ठाकूर, निलेश ठाकूर, अमर ठाकूर, मनाली ठाकूर, सागर पोवळे, जयेश ठाकूर व अन्य प्रवाशांनी दिली आहे.

जेएनपीटी बंदरावर आधारित कंटेनरमधील माल साठवणुकीसाठी उभारण्यात आलेली गोदामे ही पूर्वी उरणच्या पश्चिम विभागातच होती. मात्र, ती आता खोपटा खाडीकडील पूर्व विभागातही उभी राहिली आहेत. या गोदामांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. तालुक्यातील खोपटा, कोप्रोली चिरनेर, कळंबुसरे, विंधणे, भोम, टाकी, दिघोडे, वेश्वी, चिर्ले, जांभूळपाडा आदी गावात ही गोदामे उभी राहत आहेत. त्यामुळे बंदरातून मालाची ने-आण करणारे शेकडो कंटेनर या भागातील रस्त्यावरून प्रवास करू लागली आहेत. परंतु, या गोदामांत वाहनतळ नसल्यामुळे या ठिकाणी ये-जा करणारे कंटेनर वाहने रस्त्यावरच उभी केली जातात. त्यातच या कंटेनर वाहनांमुळे येथील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे येथील प्रवासी नागरिकांमध्ये संतापची लाट उसळली आहे.

---

## चारिझेन फाऊंडेशनतर्फे महिलांना प्रशिक्षण

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव येथील चारिझेन फाऊंडेशनतर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत शिवणकाम, ब्युटीशिअन आणि मेहंदी प्रशिक्षणाच्या सातव्या बॅचचा शुभारंभ दि.१३ जुलै रोजी गोरगाव येथे संजीवनी सामाजिक चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्षा शितल गोगावले-कदम यांच्या हस्ते करण्यात आला.




या उपक्रमाचा उद्देश आर्थिकदृष्ट्या मागास व मध्यमवर्गीय महिलांना स्वावलंबी बनवणे हा असून, या प्रशिक्षणांद्वारे महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळणार आहे. यावेळी रमेश मोरे, जगदिश दोशी, निलेश केसरकर, दिनेश हरवंडकर, सचिन शिगवण, रोहित रातवडकर, विरेन मेहता, वंदना शेठ, रेश्मा यादव तसेच परिसरातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन चारिझेन फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन एन.एस. रंधावा, सतीश काळे, राकेश पडवळ, जय दोशी, सुजाता इंगळे व जान्हवी लाड यांनी केले होते.

## खोपोली रूग्णालयात लोकसंख्या दिन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूग्णालयात लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. जगातील लोकसंख्येच्या प्रमाणात भारताची लोकसंख्या जास्त प्रमाणात वाढत आहे, त्याचे सर्व दुष्परिणाम समाज स्वास्थ्यावर दिसुन येतात. आजच्या घडीला भारताची लोकसंख्या १५० कोटीच्या घरात आहे. याबद्दल सर्वांनी जागरूक असणे गरजेचे आहे. तसेच, लोकसंख्या नियंत्रण हीच काळाची गरज असल्याचे डॉ. वानखेडे यांनी गरोदर महिलांना मार्गदर्शन करताना केले. तर, एमजीएमच्या स्त्रीरोग तज्ञ डॉ. सुनिला यांनी कुटुंब नियोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. संगिता ठाकूर-वानखेडे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुनिला, डॉ. अर्जुन, डॉ. वंदना विश्वकर्मा, डॉ. रीना गायकवाड-दाभाडे यांच्यासह इतर डॉक्टर, कर्मचारी यांच्यास गरोदर माता उपस्थित होत्या.

---

**बैठका सभांमध्ये शेतकऱ्यांना आवाहन** | **शेताच्या बांधावर फलक लावून विम्याचा प्रसार**

## पीक विम्यासाठी जनजागृती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीचा फटका शेतकऱ्यांना कायमच बसतो. हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू केली आहे. पीक विम्याची जनजागृती गावाबरोबरच शेतांच्या बांध्यावर केली जात आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्षात भेटून पिक विमा करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. या उपक्रमाला शेतकऱ्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.**

जिल्ह्यासाठी खरीप हंगामात भारतीय कृषी विमा कंपनी मुंबई यांची एक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक असून योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलैपर्यंत आहे. त्यामुळे अवघे १४ दिवसच शिल्लक राहिले आहेत. अधिसूचित पिकांसाठी खातेदारांच्या व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत पात्र आहेत. यावर्षी ही योजना राबवताना ई-पिक पाहणे म्हणजेच लागवड केलेल्या पिकाची नोंदणी डिजिटल क्रॉप सर्वे या ॲपवर करणे बंधनकारक केले आहे. त्यासाठी ओळख क्रमांक महत्वाचा आहे. ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक बंधनकारक असल्याने केवळ लागवडीखालील असलेल्या अधिसूचित पिकांचाच विमा काढता येणार आहे. यावर्षीच्या योजनेत एक रुपयात विमा हप्ता



मिळणार नसून अधिसूचित पिकांसाठी हा हप्ता २ टक्के आहे. मात्र, विमा कंपन्यांनी संभाव्य नुकसान भरपाईचा धोका लक्षात घेऊन विमा हप्ता कमी केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात भात पिकासाठी प्रती हेक्टरी ४५७.५० रुपये व नाचणी पिकासाठी १०० रुपये इतका विमा हप्ता जिल्ह्यासाठी आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी नमुन्यातील अर्ज, आधार कार्ड अधिसूचित पिकाचे पेरणी केलेले स्वयंघोषणापत्र, भाडेपट्टा करार असलेल्या शेतकऱ्यांचा करारनामा संमती पत्र, बँक पासबुक आदी कागदपत्र आवश्यक आहेत.

जिल्ह्यामध्ये पिक विमा उतरविण्यासाठी ग्रामसभेसह वेगवेगळ्या ठिकाणी बैठका घेऊन जनजागृती केली जात आहे. जिल्ह्यात सध्या लावणीचा हंगाम सुरू झाला आहे. शेताच्या बांधावर जाऊन कृषी अधिकारी व कर्मचारी फलकामार्फत जनजागृती करून विम्याचे महत्व पटवून देण्याचे काम करीत आहेत.

### फलकाचे बिल प्रलंबित

**पिक विमा योजनेसाठी कृषी विभागाकडून गावोगावी जाऊन जनजागृती केली जात आहे. त्यासाठी लागणारे फलक तयार करण्यापासून वेगवेगळ्या प्रकारच्या जाहीराती तयार करण्याचे काम कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. मात्र, जनजागृती फलकांचे बीलच विमा कंपनीकडून लवकर मिळत नसल्याची चर्चा सध्या कृषी विभागात सुरु आहे. त्यामुळ जनजागृतीच्या फलकाचे बील प्रलंबित असल्याचे बोलले जात आहे.**

---

# निवडक



## आदर्श पतसंस्थेच्या उरण शाखेचा वर्धापन दिन साजरा

**उरण** : आदर्श पतसंस्था अलिबाग संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील व अध्यक्ष अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शाखेचा दुसरा वर्धापन दिन मंगळवारी (दि.१५) साजरा करण्यात आला. आदर्श पतसंस्था अलिबागच्या एकूण १९ शाखा आहेत. यावेळी उरणच्या शाखेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्ताने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रीष्मा सातमकर, रोहित पाटील, निकेतन पाटील, भाग्यश्री पाडावे, वैभवी धाके, मंथन गायकवाड, अमृता गुरव, वैभवी धारवे, सभासद आदी उपस्थित होते. उरण शाखा व्यवस्थापक रोहित पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत करून आभार मानले. आदर्श पतसंस्थावतीने दरवर्षी रक्तदान शिबीर व मोतीबिंदू शिबीर आयोजित करण्यात आले.

## श्रीक्षेत्र महडच्या वेळेत बदल

**रसायनी** : श्री अष्टविनायक क्षेत्रापैकी एक तसेच नवसाला पावणारा म्हणून प्रसिद्ध असलेल्या महड येथील श्री वरदविनायक मंदिराच्या दर्शन वेळेत बदल करण्यात आला आहे. हा बदल १ ऑगस्टपासून अमलात येणार आहे. नवीन वेळापत्रकानुसार, दररोज सकाळी सहा वाजल्यापासून रात्री साडेदहा वाजेपर्यंत दर्शन




खुले राहणार आहे. तसेच, विशेष दिवशी म्हणजे संकष्टी चतुर्थीला पहाटे चार वाजल्यापासून रात्री बारा वाजेपर्यंत, तर अंगारकी चतुर्थीला मध्यरात्री तीन वाजल्यापासून रात्री बारा वाजेपर्यंत दर्शनासाठी खुले असणार आहे. हा निर्णय दर्शन व्यवस्थापन अधिक सुकर करण्यासाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी घेण्यात आला आहे. मंदिरात दररोज आणि विशेषतः चतुर्थीच्या दिवशी होणारी भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता, संस्थान मार्फत सुरक्षा व व्यवस्थापन दृष्टीने हा बदल आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. श्री गणपती संस्थानच्या कार्याध्यक्षा मोहिनी वैद्य यांनी माहिती दिली आहे. भाविकांनी संस्थानाच्या या निर्णयास सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानाने केले आहे.



## खोपोली नगरपरिषदेवर हंडा मोर्चा

**खोपोली** : नगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या ४० लाख लिटरची साठवण टाकीच्या दुरूस्तीचे काम गेल्या चार महिन्यांपासून सुरू आहे. अद्याप हे काम पूर्ण झाले नसुन शहरात एकवेळ पाणीपुरवठा केला जात असल्यामुळे विविध प्रभागातील महिलांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहर अध्यक्ष अतुल पाटील आणि महिला शहर अध्यक्षा सुवर्णा मोरे यांच्या नेतृत्वाखाली खोपोली नगरपरिषदेच्या कार्यालयावर सोमवारी (दि.१४) हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शहरात दोनवेळ पाणीपुरवठा सुरू न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा सुवर्णा मोरे यांनी दिला आहे. या हंडा मोर्चासाठी सुवर्णा मोरे, जयश्री डोंगरे, दिपाली भोसले यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दरम्यान, जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आल्या.

## शिहुत ५० जणांचे रक्तदान

**सुकेळी** : पेण तालुक्यातील शिहु येथिल डॉ. पुरुषोत्तम भोईर यांच्या निवासस्थानी रविवारी (दि.१३) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकुण ५० नागरीकांनी रक्तदान केले. रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन आणि रोहा तालुका मेडीकल असोसिएशन यांच्या सहकार्याने डॉ. पुरुषोत्तम भोईर व डॉ. प्रिया भोईर यांच्या संकल्पनेतून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसाद भोईर यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. रोहीदास शेळके, डॉ. सुनिल पाटील, डॉ. मुकेश सिंग, डॉ. दिपक गोसावी, डॉ. आदित्य शिरसाट, डॉ. हिरामण कोकाटे, के.के. कुथे, दामोदर भोईर, डॉ. अंकिता भोईर, डॉ. अभिषेक शहासने, डॉ.संकेत म्हात्रे, डॉ. प्रथमेश, डॉ. प्रंशात गांगल, डॉ. कुमार ओसवाल, डॉ. दिलीप साबले, डॉ. नरेश सोष्टे, डॉ. हाफिज, डॉ. प्रविण करकरे, डॉ. प्रिया भोईर, डॉ. माधवी पाटील, डॉ. साधना झोलगे, डॉ. अश्विनी कुथे, डॉ. मनिष रायकवार आदि डॉक्टर उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पिक-अप ४०७, आयशट डंपर वरील ड्रायवर पाहिजे आहेत झिराड आणि मांडवा येथील सपर्क : ८८०६६८३२३२ /८००७८९३२३२
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहे. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास, ४) X-RAY साठी मुले, आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र सोबत आणावे. संपर्क : ७७४५०५००२५/९१११९५६५०२२/९३२१३०३९३८
- अलिबागमध्ये लेडीज ब्युटी पार्लरमध्ये कामासाठी अनुभवी मुली पाहिजे. मो. ८१४९८६५६२५, ९९२१०७३९६३
- घरकामासाठी अलिबागमध्ये बाई पाहिजे. मो. ८१४९८६५६२५
- अलिबागमधील ऑफिसकरीता सिवील सुपरवायझर. civil engineer व ड्राफ्टसमन पाहिजे. मो.नं. ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री. शिवनाथ अनंता ऐनकर रा.खांडस ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे खांडस, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ५८/१/अ | एकुण क्षेत्र ०-९८-०० यापैकी विकत दिलेले क्षेत्र ०-९८-०० | ०-८५ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क ,लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १७/०७/२०२५

सही /-
**ॲड.गीतांजली जी. फुलावरे.**
कार्यालय पत्ता: ''मधुतारा'' बिल्डींग,
कचेरी रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड.
मो.८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
## (तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म. र अर्ज २६८/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. महमुदा बेगम अ. कादिर सुभेदार, (लग्नानंतरचे नाव)
श्रीम. महमुदा हबिबुल्ला शिरसिकर, — अर्जदार
रा. वरवटने, जि. रायगड

विरुद्ध

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. महमुदा बेगम अ.कादिर सुभेदार, (लग्नानंतरचे नाव) श्रीम. महमुदा हबिबुल्ला शिरसिकर, यांचा जन्म दि. २२/१०/१९५२ रोजी राहत्या घरी मौजे मजगांव, ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मजगांव, कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्रीम. महमुदा बेगम अ. कादिर सुभेदार, (लग्नानंतरचे नाव ) श्रीम. महमुदा हबिबुल्ला शिरसिकर, यांचा जन्म दि. २२/१०/१९५२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयांत दि. ५/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(संजय तवर)**
प्र. तहसिलदार मुरुड-जंजिरा

## अलिबाग येथील मे. दुसरे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १०४/२०२५

दिपाश्री हरिश्चंद्र सातर्डेकर — अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीस द्वारे असे कळविणेंत येते की, दिपाश्री हरिश्चंद्र सातर्डेकर ही कै. शर्मिला शरद कांबळी यांची कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

अर्जदार हिचे व्यतिरिक्त अन्य कोणीही कै. शर्मिला शरद कांबळी यांना वारस नाहीत असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार हिचे व्यतिरिक्त कै. शर्मिला शरद कांबळी यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यानी या न्यायालयांत दिनांक २०/०८/२०२५ रोजी सकाळी १०-३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक २०/०८/२०२५ रोजी या जाहीर नोटीसला अनूसरुन अन्य कोणीही मयत कै. शर्मिला शरद कांबळी यांचे वारस असल्याबाबतचे पुराव्यानिशी कळवले नाही तर हे न्यायालय अर्जदार यांचे लाभात वारस दाखल जारी करणेची पुढील कार्यवाही करेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

अलिबाग : १६/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, मौजे-खडसांबळे, तालुका-सुधागड, जिल्हा-रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकती आमचे आशिल श्री.तानाजी दत्तू पडवळ, व इतर यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले असून या मिळकतीत इतर कोणाचा काही हक्क हितसंबंध, गहाण, तारण, लिज, पोटगी, निवाडा, भाडेपट्टा, अगर अन्य प्रकार हक्क हितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत ॲड.डी. आर. उफाळे यांचेकडे लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात. या मुदतीत हरकती न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून या मिळकतीबाबत पुढील व्यवहार केले जातील व त्याप्रसंगी कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. याकरिता जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,**

मौजे-खडसांबळे, ता. सुधागड, जिल्हा-रायगड. येथील श्री. नथुराम हनुमंत बेलसे व इतर तसेच श्री. जगन्नाथ मोरेश्वर पवार व इतर ह्यांचे महसुल दप्तरी सातबारा सदरी खालीलप्रमाणे मिळकती असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| सर्व्हे नं. | क्षेत्र लागवडीयोग्य हे.आर.चौ.मी. | पोट हे.आर.चौ.मी. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ११/२/अ | २.४२.०० | ०.९२.०० | ३.३४.०० | ०.७० |
| १३/९ | ०.९१.०० | ०.३६.०० | १.२७.०० | ०.२६ |
| १३/१० | ०.५१.०० | ०.१०.०० | ०.६१.०० | ०.२५ |
| १८/२/ब | ०.६२.४० | ०.१०.१० | ०.७२.५० | ०.२२ |
| १८/६/ब | ०.४०.२० | ०.१३.८० | ०.५४.०० | ०.१७ |
| १८/८ | ०.२०.०० | ०.०६.०० | ०.२६.०० | ०.०६ |
| १९/१/अ | ०.६३.०० | ०.२१.३० | ०.८४.३० | ४.११ |
| १९/१/ब | ०.४१.०० | ०.००.०० | ०.४१.०० | ७.०० |
| १९/२ | ०.७३.०० | ०.००.०० | ०.७३.०० | ७.०९ |
| २०/१/ब | १.०६.६० | ०.५४.४० | १.६१.०० | ०.४९ |
| २०/४/ब | ०.६२.५० | ०.१७.५० | ०.८०.०० | ०.२१ |

दिनांक :- १६-०७-२०२५

सही/-
वकील. श्री.डी.आर. उफाळे
कार्यालय-परमार कॉम्पलॅक्स, शाप नं.०१
एस.टी.स्टडच्यामागे पाली सुधागड रायगड.
४१० २०५, मो.नं.९५९४३३६१११

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे जांभिवली ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली शेत जमिन मिळकत आमचे अशिलांनी मालक कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जांभिवली ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| राजेंद्र श्रीधर धायबर, कल्पना श्रीधर धायबर | ६५ | ५ | ०-१३-०० | ०-३४ |

तरी सदरील मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

ता. १७/०७/२०२५
मो. नं. ९९२१०२३८९४

**ॲड. योगेश का. देशमुख.**
पत्ता. श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट न१०४ कदम वाडया जवळ, स्टेशन रोड कर्जत ता. कर्जत, जि. रायगड


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाईन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी पुढे वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक (१) वैशाली विश्वनाथ जोशी (पूर्वाश्रमीची लिला विष्णु टिल्लु), (२) माधवी अनंत काळे (पूर्वाश्रमीची नलिनी विष्णू टिल्लु), (३) जयश्री सतीश भट्ट (पूर्वाश्रमीची जयश्री विष्णू टिल्लु) यांचेकडून कायम मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी त्यांचेदरम्यान झालेली आहेत. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मौजे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील पुढील वर्णनाच्या बिनशेती सिटीसर्व्हे मिळकती

| सिटी सर्व्हे नं. | क्षेत्रफळ (चौमी) | सत्ताप्रकार |
|---|---|---|
| ७१८ | ५८१.९० | अे |
| ७१८/१ | १६९.४० | सी |
| ७१८/२ | ५४.३५ | सी |
| ७१८/२के | ७८.६० | अे |
| ७९८/१के | ९२.०० | सी |
| एकूण क्षेत्रफळ | ९६८.२५ | |

सदर मिळकतींस चतु:सिमा
पुर्वेस : सि.स.न.७१९/१ व ७२०/१अ
पश्चिमेस : सि.स.नं. ७१७
दक्षीणेस : स.नं.१३५ (गोविंदबाग)
उत्तरेस : ९.०० मीटर रुंद रस्ता

व त्या मिळकतीमध्ये स्थित असलेल्या (१) अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक १३८० (संगणकीकृत मालमत्ता क्र-Z1BHA001641), आणि (२) अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक १३८१ (संगणकीकृत मालमत्ता क्र-Z1BHA001642) हया दोन घर मिळकती, विहीर व इतर इमल्यांसहीत असलेली दरोबस्त मिळकत

सदरहू वर्णन केलेल्या चतु:सिमांकीत मिळकती निर्वेध बोजारहीत असल्याची व त्या मिळकती आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, जामिनकी, कुळहक्क, कबजा वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार रजिस्टर खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १७/०७/२०२५

सही /-
**ॲड. उमेश बाळकृष्ण म्हात्रे**
जिल्हा व सत्र न्यायालय
अलिबाग- रायगड.
मोबाईल नं. ९९२२७१६३११

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण जिल्हा रायगड
## नोटीस

जा.क्र.५७४ — १७/०७/२०२५

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण जिल्हा रायगड या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण या प्रवर्गातील/मतदारसंघातील संचालक/संचालकाच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण, कै.ना.भि. दाबके गुरुजी सभागृह पेण कार्यालय या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत नैमित्तिक रिक्त झालेले पद निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

| अ.क्र | तपशिल | |
|---|---|---|
| १. | नामनिर्देशन पत्र वाटप व स्विकृती | सकाळी ११:०० ते दुपारी १२:०० |
| २. | नामनिर्देशन पत्र छाननी | दुपारी १२:०० ते दुपारी १२:३० |
| ३. | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्ध | दुपारी १:०० |
| ४. | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी १:०० ते दुपारी १:३० |
| ५. | अंतिम उमेदवारची यादी प्रसिद्ध करणे | दुपारी १:३० |
| ६. | मतदान प्रक्रिया | दुपारी २:०० ते दुपारी २:३० |
| ७. | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी २:३० ते दुपारी ३:०० |
| ८. | निवडून आलेल्या पदधिकाऱ्याबाबत निकाल घोषित करणे | दुपारी ३:०० |

टिप :- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील

मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने
दिनांक १७/०७/२०२५ — स्वाक्षरी
ठिकाण - पेण — सेक्रेटरी

शिक्का

**पेण प्राथमिक शिक्षक सह. पतपेढी लि.**
सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकीय संचालक

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. अमर दयाराम माळी, २) श्री. योगेश बाळकृष्ण पाटील रा. मु. ताडवागळे ता. अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ताडवागळे ता. अलिबाग | ५८/५९/६०/१० | ०-७२-२० पो.ख.०-१०-०० एकूण ०-८५-२० | १.२२ |

सदर वर नमूद केलेली शेती मिळकत व त्यामधील असलेले ग्रुप ग्रामपंचायत ताडवागळे घर नं. २५८ क्षेत्र १८६ चौ.मी. चौ.फुट अशी सर्व मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (०७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १६/०७/२०२५

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता- दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-वर्णे, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पाँ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. मनोहर नामदेव देशमुख | १४ | ८ | ०-६८-०० गुंठे क्षेत्रापैकी खरेदी देणार यांच्या मालकीची ०-२८-०० गुंठे क्षेत्र मिळकत | ०-२० |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १६/०७/२०२५

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक १. गीता दीपक प्रभु २. पारस विष्णु प्रभु यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे वडवली, ता.कर्जत, जि.रायगड | ४०/१५ | ०.१५.५० | १.६९ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : /०७/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो.नं. ९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती जमीन मालकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-भानसोली, ता. कर्जत, जि. रायगड.**

| अ. क्र. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | २०/५ | ०.६५.०० यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे बिनशेती जमीन मिळकतीचे क्षेत्र ०.५०.०० हे. आर. पॉ. | ०.८७ | फिरोझ अहमदहुसेन शेख |
| २. | २०/२/अ | ०.५९.४० यापैकी रस्त्याकरीता १६४ फुट उंच व ३० फुट रूंद | ०.८३ | फिरोज अहमद शेख |

तरी वरील मिळकतींमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७(सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून, आमचे अशील सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १७/०७/२०२५

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड - ४१०२०१.

दिनांक :- १७/०६/२०२५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे मांडवे तर्फ बामणगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री.सुरज सोनू पवार यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत हि निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे पाझर, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| पाझर ता.अलिबाग | ४९ | एकूण क्षेत्र ०-६५-०० | १३.०९ |

वर नमूद मिळकतीपैकी सुरज सोनू पवार यांच्या मालकीचे क्षेत्र ०-१६-०० हे. आर., आकार ३.७७ रु.पैसे., या मिळकतीबाबतचे

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफीस पत्ता :- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.
एस.एम.कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड.
मो.नं. ९७६७०१०९०२


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकती तिच्या मालक सौ.संगिता राजेंद्र पोळेकर, रा.२०३, श्रीजी कृपा बिल्डिंग, आर.डब्ल्यू. सावंत मार्ग, आनंद पार्कजवळ, ठाणे ४००६०१ आधार क्र.९९४६४९१९ ६५६४ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे-बलीवरे, ता.कर्जत, जि रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १७७ | १२/क/२ | २-५५-०० | १-८५ |
| १७८ | ५/२ | १-४३-०० | ०-८० |

तरी वर नमुद मिळकतींशी कोणत्याही इसम, कंपनी, भागीदारी संस्था अथवा अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १७/०७/२०२५

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८५०८००८१३

## जाहीर नोटीस

दि. १६/०७/२०२५

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री.संदेश लक्ष्मण बैकर यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आवेटी, ता.अलिबाग | १०१ | ०-९१-०० पो.ख. ०-१२-०० एकूण क्षेत्र १-०३-०० | १.६२ |

वर नमूद केलल्या मिळकतीपैकी संदेश लक्ष्मण बैकर यांच्या हिश्याचे क्षेत्र ०-५९-०० हे. आर., पो.ख. ०-०८-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-६७-०० हे. आर., आकार १.०५ रु. पैसे हि मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड.मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ७७४३८०९६५३

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस हया जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे नागलोली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट नं.३५१, एकूण क्षेत्र १२-२४-०० आकार-४.१२/- पैकी क्षेत्र १-३९-००, पो. ख. क्षेत्र १-६८-००, आकार-०.६० या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम.शितल मयुर जैन, रा.श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन जि.रायगड. यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची बोलणी केली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. सदर जमिन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधीत सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी मिळवून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यानी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. १५/०७/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा.कसबा पेठ, श्रीवर्धन,
ता.श्रीवर्धन, जि.रायगड

सही/-
**गोदावरी सुरेश करडे**
B.Sc. LL.M
खरेदीदाराचे वकील
९३७०२६८५५८
८६९८०००२३८

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील बिनशेती नमूद वर्णनाची मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अनील रामचंद्र म्हात्रे, यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रं. | क्षेत्र-(आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे ता.अलिबाग, जि.रायगड | ३२/१/ब/५ | २-८०-०० | २८.०० |

अलिबाग,
दि. १६/०७/२०२५

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor, Flat No.1.
Ch. Shivaji Chouk. Near Gawade Optics,
Alibag Raigad

## निवडक



### वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स टी २० स्पर्धा
## भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली :** वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स टी स्पर्धेसाठी इंडिया चॅम्पियन्स संघाची घोषणा करण्यात आली आहे. १७ सदस्यीय चॅम्पियन्स संघाचे नेतृत्व टीम इंडियाचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग करेल. या संघात सुरेश रैना, शिखर धवन, इरफान पठाण, युसूफ पठाण आणि इतर अनेक अनुभवी क्रिकेटपटूंचा समावेश आहे. माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पा आणि विनय कुमार हे देखील इंडिया चॅम्पियन्स संघात आहेत. २०२४ मध्ये झालेल्या पहिल्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पाकिस्तान चॅम्पियन्सचा पराभव करून भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. आता, इंडिया चॅम्पियन्सना पुन्हा ५ संघांना हरवून २०२५ मध्ये चॅम्पियन बनण्याचा विश्वास आहे. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स टी स्पर्धेचा दुसरा हंगाम१८ जुलैपासून सुरू होणार आहे. इंग्लंडमध्ये होणाऱ्या सहा संघांमधील या टी स्पर्धेचा अंतिम सामना २ऑगस्ट रोजी बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन स्टेडियमवर होणार आहे. **भारत चॅम्पियन्स संघ :** युवराज सिंग (कर्णधार), शिखर धवन, हरभजन सिंग, सुरेश रैना, सौरभ तिवारी, इरफान पठाण, युसूफ पठाण, रॉबिन उथप्पा, अंबाती रायडू, गुरकृत मान, राहुल शर्मा, नमन ओझा, राहुल शुक्ला, आरपी सिंग, विनय सिंग, पवन कुमार, विनय कुमार.

## दिव्या काकरनचा अडीच वर्षांत घटस्फोट

**मुझफ्फरनगर :** बॅडमिंटनपटू सायना नेहवालनंतर आता उत्तर प्रदेशातील आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू दिव्या काकरनने तिचा पती सचिन प्रताप सिंगपासून घटस्फोटाची घोषणा केली आहे. तिने या संदर्भात इंस्टाग्रामवर एक भावनिक कहाणी पोस्ट केली आहे. ज्यामध्ये तिने या निर्णयाचे तिच्या आयुष्यातील सर्वात कठीण अध्याय असल्याचे म्हटले आहे.दिव्य मराठीने कुस्तीपटू दिव्याशी यासंबंधित बातचीत केली. ती म्हणाली, गेल्या ४-५ महिन्यांपासून आमच्यात सगळं काही ठीक चाललं नव्हतं. आम्हाला वाटत होतं की सगळं काही ठीक होईल. पण आता आम्ही वेगळे होण्याचा कठीण निर्णय घेतला आहे. आमचा विवाह अरेंज्ड होता. मला जे काही लिहायचं होतं ते मी सोशल मीडियावर लिहिलं आहे. मला इतर काहीही सांगायचं नाही. बाकी सगळं वैयक्तिक आहे.दिव्या ही अर्जुन पुरस्कार विजेती कुस्तीगीर आहे. तिने आशियाई क्रीडा स्पर्धा आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत देशासाठी पदके जिंकली आहेत. तिने ८ वेळा भारत केसरी किताब जिंकला आहे. सध्या ती उत्तर प्रदेशात नायब तहसीलदार आहे.दिव्या काकरनने इंस्टाग्रामवर लिहिले. हा माझ्या आयुष्यातील सर्वात भावनिक आणि कठीण अध्यायांपैकी एक आहे. यासाठी खूप वेदना, चिंतन आणि आत्मपरीक्षण करावे लागले, ज्याची मी कधीही कल्पना केली नव्हती. हा निर्णय शेअर करणे सोपे नव्हते, परंतु तिच्या समर्थकांच्या पाठिंब्यामुळे तिला ते शेअर करणे आवश्यक वाटले.दिव्या पुढे लिहिते, आता मी हळूहळू सामान्य होत आहे. कधीकधी आयुष्य असे वळण घेते ज्याची कोणीही कल्पना करू शकत नाही. मी स्वतःला स्थिर करण्याचा प्रयत्न करत आहे आणि अशा मार्गांवर चालत आहे ज्याची मी कधीही अपेक्षा केली नव्हती.

## यश दयालच्या अटकेला स्थगिती

**प्रयागराज :** अलाहाबाद उच्च न्यायालयाने क्रिकेटपटू यश दयालच्या अटकेला स्थगिती दिली आहे. न्यायालयाने म्हटले आहे की- तुम्हाला एक-दोन दिवसांसाठी मूर्ख बनवता आले असते. पण ५ वर्षांच्या नात्यात कोणालाही मूर्ख बनवता येत नाही. यश दयालने लैंगिक छळाच्या एफआयआरविरुद्ध याचिका दाखल केली होती.मंगळवारी न्यायमूर्ती सिद्धार्थ वर्मा आणि न्यायमूर्ती अनिल कुमार यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. न्यायालयाने यश दयाल यांच्या विरोधी पक्षाला नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. एका तरुणीने क्रिकेटपटूवर लग्नाचे आमिष दाखवून तिचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप केला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, दोघे सुमारे पाच वर्षांपूर्वी भेटले होते. २७ वर्षीय दयालविरुद्ध ६ जुलै रोजी गाझियाबादमधील इंदिरापुरम पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ६९ (फसव्या लैंगिक संबंध) अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला.

## लियाम डॉसनचे पुनरागमन

**लंडन :** इंग्लंड क्रिकेट बोर्डाने चौथ्या कसोटीसाठी इंग्लंड संघाची घोषणा केली आहे. डावखुरा फिरकी गोलंदाज लियाम डॉसन ८ वर्षांनी संघात परतला आहे. तिसऱ्या कसोटीत दुखापत झालेल्या ऑफस्पिनर शोएब बशीरची जागा डॉसन घेईल. लियाम डॉसन ८ वर्षांनी कसोटी संघात परतला आहे. त्याने जुलै २०१७ मध्ये इंग्लंडसाठी शेवटचा कसोटी सामना खेळला होता. ३५ वर्षीय डॉसनने फक्त ३ कसोटी सामने खेळले आहेत, परंतु अलिकडच्या काळात त्याने हॅम्पशायरसाठी सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. २०२३ आणि २०२४ मध्ये त्याने प्रोफेशनल क्रिकेटर्स असोसिएशनचा वर्षातील सर्वोत्तम खेळाडू पुरस्कार जिंकला. अलिकडेच झालेल्या काउंटी चॅम्पियनशिपमध्ये त्याने ९ सामन्यात ४०.०४ च्या सरासरीने २१ विकेट्स घेतल्या. व्हाइटॅलिटी ब्लास्टमध्येही त्याने १० सामन्यात ११ विकेट्स घेतल्या. राष्ट्रीय निवडकर्ता ल्यूक राईट म्हणाले की, लियाम डॉसनने आपले स्थान निश्चित केले आहे. काउंटी चॅम्पियनशिपमध्ये त्याची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे आणि तो हॅम्पशायरसाठी सातत्याने चांगले खेळत आहे. डॉसनने इंग्लंडसाठी तिन्ही फॉरमॅट खेळले आहेत. गेल्या महिन्यात वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० सामन्यात त्याने पुनरागमन केले, जिथे त्याने तीन सामन्यांमध्ये पाच विकेट्स घेतल्या, जे मालिकेतील सर्वाधिक विकेट्स आहेत.



### महिला वन डे वर्ल्ड कप २०२५
# आठ संघांमध्ये होणार सराव सामने

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महिला वनडे वर्ल्ड कप २०२५ भारत व श्रीलंकेत ३० सप्टेंबरपासून होणार आहे.स्पर्धेपूर्वी ९ सराव सामने २५-२८ सप्टेंबरदरम्यान आयोजित करण्यात आले आहेत. भारत अ आणि श्रीलंका अ यासारखे संघही सराव सामन्यांत सहभागी होणार आहेत.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून मंगळवारी मोठी घोषणा करण्यात आली आहे. यावर्षी भारत आणि श्रीलंका या दोन देशात महिला वनडे वर्ल्ड कप २०२५ स्पर्धा खेळवली जाणार आहे. ही स्पर्धात यावर्षी ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर दरम्यान खेळवली जाईल.

भारतातील बंगळुरू, इंदूर, विशाखापट्टणम आणि गुवाहाटी या चार ठिकाणी, तर श्रीलंकेतील कोलंबो या एका ठिकाणी या स्पर्धेतील सामने होतील. दरम्यान, आयसीसीने मंगळवारी या स्पर्धेसाठी होणाऱ्या सराव सामन्यांचीही घोषणा केली आहे.

आठ महिला संघात होणाऱ्या या स्पर्धेपूर्वी ९ सराव सामने खेळवले जाणार आहेत. सराव सामन्यांना २५ सप्टेंबरपासून सुरुवात होणार असून २८ सप्टेंबरपर्यंत हे सराव सामने खेळवले जातील. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व ८ संघ सराव सामन्यात सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघ दोन सराव सामने खेळणार आहे, पण याला अपवाद केवळ ऑस्ट्रेलिया आहे. ऑस्ट्रेलिया एकच सराव सामना खेळणार आहे.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की भारत अ आणि श्रीलंका अ संघही या सराव सामन्यात सहभागी होणार आहे. भारताचा अ संघ एक सराव सामना खेळेल, तर श्रीलंकेचा अ संघ दोन सराव सामने खेळणार आहे. भारत अ संघ २८ सप्टेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सराव सामना खेळेल, तर श्रीलंका अ संघ २५ सप्टेंबर रोजी बांगलादेशविरुद्ध, तर २८ सप्टेंबर रोजी पाकिस्तानविरुद्ध सराव सामना खेळणार आहे.

भारताचा राष्ट्रीय संघ २५ सप्टेंबर रोजी इंग्लंडविरुद्ध आणि २७ सप्टेंबर रोजी न्यूझीलंडविरुद्ध सराव सामना खेळणार आहे. भारताचे दोन्ही सराव सामने दुपारी ३ वाजता सुरू होतील. ऑस्ट्रेलिया एकमेन सराव सामना इंग्लंडविरुद्ध २७ सप्टेंबर रोजी खेळेल.

सराव सामन्यांसाठी चार ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. बंगळुरूमधील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सेलन्स ग्राऊंड आणि एम चिन्नास्वामी स्टेडियम, तसेच श्रीलंकेतील कोलंबोमधील आर प्रेमदासा स्टेडियम आणि कोलंबो क्रिकेट क्लब ग्राऊंड या एकूण चार ठिकाणी सराव सामने होणार आहेत. भारताचा संघ पहिला सराव सामना सेंटर ऑफ एक्सेलन्स ग्राऊंडवर आणि दुसरा सराव सामना एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळणार आहे.

महिला वनडे वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेत यजमान भारत आणि श्रीलंकाव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, बांगलादेश आणि पाकिस्तान हे संघ सहभागी होणार आहेत. दरम्यान, पाकिस्तान वगळता बाकी सर्व संघ भारतात खेळणार आहे. पण पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेतील कोलंबोमध्ये खेळवले जाणार आहेत.



सामन्यांचे वेळापत्रक घोषित

### महिला वन डे वर्ल्ड कप २०२५
### सराव सामन्यांचे वेळापत्रक

- **२५सप्टेंबर :** भारत विरुद्ध इंग्लंड; बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स १ ग्राउंड, बेंगळुरू, (वेळ – दु. ३ वा.)
- **२५ सप्टेंबर :** दक्षिण आफ्रिका विरुद्ध न्यूझीलंड; एम. चिन्नास्वामी, बेंगळुरू, (वेळ – दु. ३ वा.)
- **२५ सप्टेंबर :** श्रीलंका विरुद्ध पाकिस्तान; कोलंबो क्रिकेट क्लब ग्राऊंड, कोलंबो, (वेळ – दु. ३ वा.)
- **२५ सप्टेंबर :** बांगलादेश विरुद्ध श्रीलंका अ; आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो, (वेळ – दु. ३ वा.)
- **२७ सप्टेंबर :** ऑस्ट्रेलिया विरुद्ध इंग्लंड, बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स १ ग्राउंड, बेंगळुरू, (वेळ – दु. ३ वा.)
- **२७ सप्टेंबर :** भारत विरुद्ध न्यूझीलंड, एम. चिन्नास्वामी, बेंगळुरू, (वेळ– दु. ३ वा.)
- **२७ सप्टेंबर :** श्रीलंका विरुद्ध बांगलादेश, कोलंबो क्रिकेट क्लब ग्राऊंड, कोलंबो, (वेळ – दु. ३ वा.)
- **२८ सप्टेंबर :** दक्षिण आफ्रिका विरुद्ध भारत अ, बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स १ ग्राउंड, बेंगळुरू, (वेळ – दु. ३ वा.)
- **२८ सप्टेंबर :** पाकिस्तान विरुद्ध श्रीलंका अ, कोलंबो क्रिकेट क्लब ग्राऊंड, कोलंबो, (वेळ – दु. ३ वा.)

# आयसीसीचा इंग्लंडला डबल दणका
### लॉर्ड्स कसोटी जिंकूनही संघाचा मोठा तोटा!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड संघाने लॉर्ड्स कसोटी सामना जिंकला असला तरी, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने म्हणजेच आयसीसीने संघाला मोठा दंड ठोठावला आहे. इतकेच नाही तर भारताविरुद्ध विजय मिळवूनही इंग्लंड संघाच्या खात्यातून आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचे गुणही कापण्यात आले. आयसीसीने स्लो ओव्हर रेटसाठी इंग्लंडला मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावला आहे. संघाच्या खात्यातून दोन डब्ल्यूटीसी पॉइंटही कमी केले. यानंतर इंग्लंडच्या विजयाची टक्केवारी ६६.६७ वर घसरली. शिवाय, इंग्लंडच्या संघाची दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरण झाली.

आयसीसी एलिट पॅनेल मॅच रेफरी रिची रिचर्डसन यांनी इंग्लंड संघाला स्लो ओव्हर रेटसाठी दोषी ठरवले. इंग्लंडने दोन षटके उशिरा टाकली, ज्यासाठी आयसीसीने संपूर्ण संघाला दंड ठोठावला. आयसीसीच्या खेळाडू आणि खेळाडूंच्या सपोर्ट स्टाफसाठीच्या आचारसंहितेच्या कलम २.२२ नुसार, खेळाडूंना निर्धारित वेळेत टाकण्यात अपयशी ठरलेल्या प्रत्येक षटकासाठी त्यांच्या मॅच फीच्या पाच टक्के दंड ठोठावला जातो. इंग्लंडने लॉर्ड्स कसोटी सामन्यात निर्धारित वेळेत दोन षटके टाकली नाहीत म्हणून त्यांना १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

कर्णधार बेन स्टोक्सने चूक मान्य करून दंड स्वीकारला. त्यामुळे औपचारिक सुनावणीची आवश्यकता नव्हती. फील्ड पंच पॉल रीफेल आणि शराफुद्दौला इब्ने शाहिद, तिसरे पंच अहसान रझा आणि चौथे पंच ग्रॅहम लॉईड यांनी इंग्लंडविरुद्ध हे आरोप लावले.



## भारतीय संघाने घेतली किंग चार्ल्स यांची भेट

**लंडन :** भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेट संघांनी सेंट जेम्स पॅलेस येथे इंग्लंडचे किंग चार्ल्स यांची भेट घेतली. भारत सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे, जिथे ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळली जात आहे. इंग्लंड सध्या २-१ ने आघाडीवर आहे. त्यांनी दुसरी (लॉर्ड्स) कसोटी २२ धावांनी जिंकली. या खास बैठकीत कर्णधार शुभमन गिल, उपकर्णधार ऋषभ पंत, जसप्रीत बुमराह, केएल राहुल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हे देखील उपस्थित होते. क्लेरेन्स हाऊस गार्डन येथे संघाची ओळख किंग चार्ल्स यांच्याशी करून देण्यात आली, जिथे त्यांनी खेळाडूंशी संवाद साधला.या खास प्रसंगी, किंग चार्ल्स ळळळ यांनी सर्व खेळाडूंसोबत फोटो सेशनही केले.

## लज्जास्पद कसोटी पराभवानंतर संघात खळबळ



**। वेस्ट इंडिज । वृत्तसंस्था ।**

घरच्या मालिकेत ३-० असा पराभव झाल्यानंतर वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने दिग्गज खेळाडू ब्रायन लारा, क्लाईव्ह लॉईड आणि व्हिव्ह रिचर्ड्स यांना आपत्कालीन बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत वेस्ट इंडिजच्या अत्यंत लज्जास्पद आणि निराशाजनक कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी हे तिघेही दिग्गज क्रिकेटर स्ट्रॅटेजी कमिटीमध्ये शिवनारायण चंद्रपॉल, डेसमंड हेन्स आणि इयान ब्रॅडशॉ सारख्या दिग्गजांसोबत सहभागी होतील.

वेस्ट इंडिजने तीन दिवसांत तीन सामन्यांच्या मालिकेतील प्रत्येक कसोटी गमावली. किंग्स्टनमध्ये खेळल्या गेलेल्या शेवटच्या कसोटीच्या चौथ्या डावात वेस्ट इंडिजचा संघ १४.३ षटकांत फक्त २७ धावांवर बाद झाला, जो कसोटी क्रिकेटमधील त्यांचा सर्वात कमी आणि इतिहासातील दुसरा सर्वात कमी धावसंख्या आहे. सर्वात कमी धावसंख्येचा विक्रम न्यूझीलंडच्या नावावर आहे. १९५५ मध्ये न्यूझीलंडचा संघ इंग्लंडविरुद्ध २६ धावांवर बाद झाला होता.लाजिरवाण्या पराभवानंतर, क्रिकेट वेस्ट इंडिजचे अध्यक्ष डॉ. किशोर शालो यांनी कबूल केले की अलीकडील पराभवामुळे वेस्ट इंडिज क्रिकेट समुदायाची झोप उडेल. त्यांनी आवाहन केले की, आता नवीन खेळाडूंवर लक्ष केंद्रित करायला हवे. शालो म्हणाले, प्रगती कधीही सरळ नसते. त्यासाठी वेळ, चिकाटी आणि विश्वास लागतो, विशेषतः आपल्या सर्वात कठीण क्षणांमध्ये. पुढील वाटचाल आमची परीक्षा घेईल, पण आमच्या खेळाडूंच्या प्रतिभेवर आणि वचनबद्धतेवर मला पूर्ण विश्वास आहे.

पुढे ते म्हणाले, वेस्ट इंडीज क्रिकेटच्या विकासाच्या पुढील टप्प्याला आकार देण्यात लारा, रिचर्ड्स आणि लॉईड सक्रिय भूमिका बजावतील. हे असे लोक आहेत ज्यांनी आमच्या सुवर्णकाळाची व्याख्या करण्यास मदत केली आहे आणि त्यांचे दृष्टिकोन अमूल्य असतील. या बैठकीतून ठोस सूचना समोर याव्यात अशी आमची इच्छा आहे. जर आम्हाला खरोखर पुढे जायचे असेल तर आम्हाला सर्वांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. अजूनही बरेच काम करायचे आहे.

वेस्ट इंडीज २१ जुलैपासून ऑस्ट्रेलियासोबत पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे, त्यानंतर ऑगस्टमध्ये घरच्या मैदानावर पाकिस्तानविरुद्ध व्हाईट बॉल मालिका खेळणार आहे.

# वरुण एरोन सनरायझर्स हैदराबादचा नवा बॉलिंग कोच



**। हैदराबाद । वृत्तसंस्था ।**

सनरायझर्स हैदराबादने आयपीएल २०२६च्या हंगामासाठी वरुण आरोन याची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. तो न्यूझीलंडचे माजी वेगवान गोलंदाज जेम्स फ्रँकलिन यांची जागा घेईल. एसआरएचने त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट एक्स वर लिहिले की, आमच्या कोचिंग स्टाफमध्ये एका आक्रमक गोलंदाजाचे स्वागत आहे. वरुण आरोन एसआरएचचे नवे गोलंदाजी प्रशिक्षक असतील.

### ■ स्टाफमध्ये केले स्वागत

२०११ ते २०१५ दरम्यान वरुण आरोनने भारतासाठी ९ कसोटी आणि ९ एकदिवसीय सामने खेळले. त्याचा शेवटचा सामना या वर्षी ५ जानेवारी रोजी जयपूर येथे गोवा विरुद्ध विजय हजारे ट्रॉफी सामना होता. झारखंड संघ बाद फेरीत पोहोचू शकला नाही आणि त्यानंतर आरोनने त्याच्या क्रिकेट कारकिर्दीला अलविदा म्हटले.

३५ वर्षीय आरोनने वेगवान गोलंदाज म्हणून चांगली सुरुवात केली होती आणि १५० किमी ताशीपेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यावेळी निवडकर्त्यांनी त्याच्यावर आणि उमेश यादववर विशेष लक्ष दिले.

उमेश यादवने ५० हून अधिक कसोटी सामने खेळले, तर सतत दुखापतींमुळे आरोनला जास्त संधी मिळाली नाही आणि तो संघाबाहेर जात राहिला. निवृत्तीनंतर, आरोन टीव्ही समालोचक आणि क्रिकेट विश्लेषक म्हणून काम करत आहे.

### बहारदार अभिनयाचा लागला कस | राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धा
# मोठ्या गटात निकिता घाग, तर छोट्या गटात दुर्वा झावरे प्रथम

**। पेण । प्रतिनिधी ।**

दत्त अवधुत एंटरटेनमेंट, स्वररंग पेण आणि दर्पण व्हिजन एंटरटेनमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने कै. पांडुरंग घांग्रेकर स्मृती चषक राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धेचे शानदार आयोजन कौशिकी हॉल, दत्त नगर गेट नंबर २, पेण बोरगाव रोड येथे करण्यात आले होते.

या स्पर्धेत मोठ्या गटामध्ये प्रथम क्रमांक निकिता घाग, दुसरा क्रमांक मनाली करुणा संजय इंगळे, तृतीय क्रमांक चेतन पाटील, उत्तेजनार्थ केतन सुभाष गवळी तसेच छोटा गट प्रथम क्रमांक दुर्वा सुशांत झावरे, दुसरा क्रमांक तपस्या भानुदास पाटील, तृतीय आराध्य समीर पाटील, उत्तेजनार्थ स्मंद मंदार कोठेकर यांनी बक्षिसे पटकाविली तसेच परीक्षक पसंतीमध्ये विशेष बक्षीस मोठा गटात प्रकाश पाटील व श्रुती नाईक व छोटा गट विशेष बक्षीस अर्णव शिंदे व विहान नाईक यांनी बक्षिसे पटकाविले. या एकपात्री स्पर्धेचे परिक्षण विनोदी अभिनेते जयवंत भालेकर, दिग्दर्शक व अभिनेता देवेंद्र सरदार, लेखिका दर्शन कुकर्णी यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी म्हात्रे व हरेश पाटील यांनी केले. तर स्पर्धेचे उद्घाटन रंगकर्मी राजन पांचाळ, सुनील पाटील गर्जा रायगडचे निर्माता संतोष पाटील व परीक्षकाच्या हस्ते करण्यात आले. तर ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजक दत्त अवधुत एंटरटेनमेंटचे निर्माता कौस्तुभ छाया विलास भिडे, शाल्मली भिडे, विलास भिडे, छाया भिडे, हर्षदा भिडे, स्वररंगचे उपाध्यक्ष आणि साज मराठीचे निर्माता सुनिल पाटील, दिव्या घाडगे, कार्याध्यक्ष स्वप्नील साने, अजित साळवी, किरण देव, सुहास तेरवाडकर, सानिया पाटील, स्वरा पाटील, आदिती पाटील, पूजा सिंगासने, सायली पोतदार, उपासना जुईकर, अथर्व फाटक, विजय फाटक, आकाश मोकल, निलेश पाटील, अश्विन पाटील, अभिषेक देव, रोहित महाले, सलमान शेख, धनंजय शर्मा, निरंजन रोडेकर, प्रसाद म्हात्रे, आदींनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेसाठी धुळे, पेण, रोहा, अलिबाग डोंबिवली, पुणे, मुंबई अशा ठिकाणाहून स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून दत्त अवधुत एंटरप्रायझेस व सह प्रायोजक म्हणून आर्य क्लासेस अपूर्वा नीरज साठे यांची मोलाची मदत लाभली. तसेच सदर कार्यक्रम हा दत्त अवधुत एंटरप्रायझेस या युट्युब चॅनेलवर लाइव्ह दाखविण्यात आला. यावेळी मनोगतात एकपात्री अभिनय स्पर्धा म्हणजे एकाच कलाकाराला एका विशिष्ट भूमिकेमध्ये स्वतःचे अभिनय कौशल्य सादर करण्याची संधी मिळते. यात एकच कलाकार विविध पात्रांच्या भावना, विचार आणि कृती प्रभावीपणे सादर करतो. असे कलाकार जास्तीत जास्त आपल्या रायगड जिल्हात व परिसरात तयार व्हावेत असे मत यावेळी परीक्षक देवेंद्र सरदार यांनी मांडले. दत्त अवधुत एंटरटेनमेंट हया प्रोडक्शन हाउस मार्फत डीप हे ओटीटी ॲप लवकरच उपलब्ध होणार आहे तरी दत्त अवधुत एंटरटेनमेंट नेहमीच कलाकारांच्या कलागुणांना वाव, व्यासपीठ तसेच दर्जेदार एकपात्री एकांकिका सादर करणाऱ्या कलाकारांच्या मागे खंबीरपणे अनेक वर्षे उभे राहून हे काम करत आहे. नवीन कलाकार घडावेत नवीन कलाकृती घडाव्यात या करिता लागेल ती मदत संस्थेतर्फे देण्याचा मानस दत्त अवधुत एंटरटेनमेंट निर्माता कौस्तुभ विलास भिडे यांनी आपल्या मनोगतात बोलून दाखविला.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)